रायगड, नवी मुंबई
रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १४०
www.ramprahar.com
◆ रविवार, ७ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

प्रवाशांचे रिफंड परत करण्याचे 'इंडिगो'ला निर्देश

नवी दिल्ली : केंद्रीय हवाई वाहतूक मंत्रालयाने देशातील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या इंडिगोला कडक इशारा दिला आहे. रद्द विमानांमुळे प्रभावित झालेल्या सर्व प्रवाशांचे प्रलंबित रिफंड रविवारी ७ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजेपर्यंत पूर्णपणे क्लियर करण्याचे निर्देश मंत्रालयाने दिले आहेत. यासाठी परतफेड सुविधा कक्ष स्थापन करावेत. निर्धारित वेळेत रिफंड प्रक्रिया पूर्ण झाली नाही, तर नियामक मंडळाकडून कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही मंत्रालयाने दिला आहे. याबरोबरच सद्यपरिस्थितीचा फायदा घेऊन आगाऊ भाडे आकारणाऱ्या विमान कंपन्यांच्या संधीसाधूपणाला आळा घालण्यासाठी केंद्राने निर्देश जारी केले. भाडे मर्यादांचे काटेकोरपणे पालन करावे, असे मंत्रालयाने सर्व विमान कंपन्यांना सांगितले आहे.

अंतरंग

एआय तंत्रज्ञानातून तरुणीची बदनामी/२
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
व्हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा/८

संविधानामुळे देशाची प्रगती : मुख्यमंत्री

महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

मुंबई : प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारतात प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार देणारे संविधान दिले. या संविधानामुळेच आपला देश इतकी प्रगती करू शकला. आज आपण जगातली चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था झालो. लवकरच तिसरी अर्थव्यवस्था होऊ. याचा पाया संविधानकार व अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केला, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शनिवारी (दि. ६) दादरच्या चैत्यभूमी येथे विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवादन करून भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमास राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा, संजय शिरसाट व इतर मान्यवर उपस्थित होते.

आपल्या देशात, समाजात मोठी विषमता तयार झाली होती. या विषमतेने अनेकांचा मानव म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घेतला. अशा स्थितीत समाजात मोठी जागृती आणून समतायुक्त समाज तयार झाला पाहिजे या भावनेतून विषमतेलाच शक्ती बनवून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञान संपादित केले आणि त्या आधारावरच समाजात समतेचे रोपण केले, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. इंदू मिलच्या जागेवर उभे राहणारे डॉ. आंबेडकर स्मारक पुढील महापरिनिर्वाण दिनापूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न करू, असेही ते म्हणाले.

महामानवाचे कार्य अतुलनीय -आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल : रामप्रहर वृत्त

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजासाठी केलेले कार्य अतुलनीय असे आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. ६) महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करताना केले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेल शहरातील पुतळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह इतर मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक अनिल भगत, शिवदास कांबळे, संतोष भोईर, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्टे, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, प्रकाश खैरे, अकबर सय्यद, प्रितम म्हात्रे यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. सर्वांनी अभिवादन करून डॉ. आंबेडकरांच्या कार्याचे स्मरण केले.

कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर स्मृती व्याख्यानमाला

बहुजन समाजाच्या प्रबोधनाची पायाभरणी महात्मा फुलेंनी केली -अर्थतज्ज्ञ डॉ. मुणगेकर

सातारा : रामप्रहर वृत्त

महात्मा ज्योतिराव फुले यांना भारतातील आद्य समाजसुधारक आणि क्रांतिकारी म्हणून गौरविले गेले. बहुजन समाजाच्या प्रबोधनाची पायाभरणी महात्मा फुलेंनीच केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी सातारा येथे कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर स्मृती व्याख्यानमालेच्या उद्घाटनावेळी केले. या कार्यक्रमात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अर्थशास्त्र विभाग आणि मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कै. भागुबाई चांगू ठाकूर स्मृती व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प शुक्रवारी (दि. ५) अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या 'भारतीय शिक्षण व्यवस्था आणि बहुजन समाज' या व्याख्यानाने गुंफले गेले. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेस दिलेल्या भरघोस देणगीतून त्यांच्या दिवंगत मातोश्री कै. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मराठी अर्थशास्त्र परिषदेमार्फत जे विविध उपक्रम राबविले जात आहेत त्यातील व्याख्यानमाला हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम डॉ. मुणगेकर यांच्या व्याख्यानाने सुरू करण्यात आला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा साताऱ्यात विशेष सत्कार

या वेळी डॉ. मुणगेकर यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद माझ्या आईच्या उपक्रम राबवत आहे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट असल्याचे सांगून, छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये घेतलेल्या शिक्षणामुळे रामचा रामशेठ झाला, असे प्रतिपादन केले. आपल्या भाषणात त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील सध्याची स्थिती व आव्हानांचे विश्लेषण केले.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलाधिकारी चंद्रकांत दळवी यांनी उपस्थितांचे स्वागत करून या व्याख्यानमालेस शुभेच्छा दिल्या.

व्याख्यानमालेस कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव मस्के, रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. विकास देशमुख, उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, माध्यमिक विभागाचे सहसचिव बी.एन. पवार, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. विलास खंदारे, कार्यवाह खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, कार्याध्यक्ष विकास सुकाळे, कार्यक्रमाचे संयोजक डॉ. अनिलकुमार वावरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यकारिणी सदस्य डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. किशोर सुतार, डॉ. सविता वावरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. व्याख्यानमालेसाठी महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठांतील व महाविद्यालयातील प्राध्यापक, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यकारिणी सदस्य, आजीव सदस्य, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे पदाधिकारी व आजीव सदस्य, संशोधक विद्यार्थी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी भरघोस असा प्रतिसाद दिला व ही व्याख्यानमाला अत्यंत उत्साहामध्ये यशस्वी झाली. **(पान २ वर..)**

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आज पारितोषिक वितरण

■ ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी, सुनील बर्वे यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने होणार सन्मान

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या १२व्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि. ७) सायंकाळी ४ वाजता होणार आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या पारितोषिक वितरण समारंभात विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन गौरविण्यात येणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त यंदा ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे यांचा 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

या सोहळ्याला सन्माननीय उपस्थिती म्हणून माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी; तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे यांची उपस्थिती लाभणार आहे. **(पान २ वर..)**

टीम इंडियाने सामन्यासह मालिकाही जिंकली!

विशाखापट्टणम : वृत्तसंस्था

यशस्वी जैस्वालचे नाबाद शतक आणि विराट कोहली-रोहित शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय संघाने विशाखापट्टणमच्या मैदानातील सामना एकतर्फी जिंकत वनडे मालिका २-१ अशी जिंकली. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना २७० धावा केल्या होत्या. भारताने ६१ चेंडू आणि नऊ विकेट्स राखून सामन्यासह मालिकेवर कब्जा केला.

(पहिल्या डावाचे वृत्त पान ८ वर..)

लोणावळ्यात अपघात; दोघे ठार

खालापूर : प्रतिनिधी

गोव्यातून लोणावळा येथे आलेल्या दोन पर्यटकांचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. ६) घडली. या पर्यटकांच्या कारची शिवलिंग पॉईंटजवळ समोरून येणाऱ्या टेम्पोला जोरदार धडक बसली.

योगेश सुतार (वय २१) आणि मयूर वेंगुळकर (वय २४, दोघेही रा. म्हापसा, गोवा) अशी मृत पर्यटकांची नावे आहेत. लोणावळ्याहून सहारा सिटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर शिवलिंग पॉईंट येथे भरधाव स्विफ्ट चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कारने समोरून येणाऱ्या टेम्पोला जोरदार धडक दिली. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला करत मृत्युमुखी पडलेल्या दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. घटनेचा अधिक तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करीत आहेत.

बनावट नोटाप्रकरणी दोघांना सश्रम कारावास

अलिबाग : प्रतिनिधी

बनावट नोटा तयार करून त्या चलनात आणल्याप्रकरणी दोघा आरोपींना अलिबागचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.डी. भगत यांनी तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. मोहम्मद आवेश मोहम्मद अकबर शेख व सोहेल शर्फराज खान अशी आरोपींची नावे आहेत.

दोन्ही आरोपी मूळचे ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील रहिवासी आहेत. न्यायालयाने आरोपी मोहम्मद आवेश मोहम्मद अकबर शेख याच्याकडून २० हजार रुपये, तर आरोपी सोहेल शर्फराज खान याच्याकडून १५ हजार रुपये दंडवसुलीचे आदेशही दिले आहेत. मार्च २०२२मध्ये या दोघांनी पेणमधील एका दुकानदाराला १०० रुपयांची बनावट नोट देऊन त्याच्याकडून सिगारेट खरेदी केली होती. दुकानदाराला संशय आल्याने दोघेही पकडले गेले. त्यांच्या गाडीच्या डिकीमध्ये बनावट नोटा सापडल्या. सखोल चौकशी केली असता ते बनावट नोटा छापून चलनात आणत असल्याचे समोर आले. त्यांच्याकडून बनावट नोटा छापण्याचे साहित्य हस्तगत करण्यात आले होते.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाअंती अलिबाग सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. खटल्याच्या सुनावणीदरम्यान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. कोमल राठोड यांनी न्यायालयासमोर केलेला जोरदार युक्तीवाद महत्त्वपूर्ण ठरला. या प्रकरणात त्यांनी १३ साक्षीदार तपासले. त्यात फिर्यादी, पंच, साक्षीदार, हवालदार संदीप देसाई, तपासिक अंमलदार पोलीस निरीक्षक डी. आर. पोळ यांची साक्ष महत्त्वाची ठरली तसेच उपनिरीक्षक सुनील डोंगे (पैरवी अधिकारी), सहाय्यक उपनिरीक्षक पांडुरंग पाटील, विजय सरके, हवालदार हवालदार जे.ए. बैकर, सचिन खैरनार, प्रवीण पाटील, रमेश कुथे, संदेश नाईक यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

नेरळमध्ये तरुणीची एआय तंत्रज्ञानातून बदनामी

सायबर गुन्हेगाराला पोलिसांच्या बेड्या

नेरळ : प्रतिनिधी

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत एका तरुणीचे फोटो एआयच्या माध्यमातून एडिट करून बदनामी करणाऱ्या सायबर गुन्हेगाराला अखेर नेरळ पोलिसांनी शिताफीने पकडले आहे. प्रसाद जगन्नाथ वास्ते असे आरोपीचे नाव समोर आले असून सुरुवातीला या धक्कादायक घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती.

नेरळ परिसरातील पीडित तरुणीच्या नावाचे अज्ञात व्यक्तीने खोटे इन्स्टाग्राम अकाउंट तयार केले होते. त्यावरून तिचे मूळ फोटो एआय तंत्रज्ञान व एडिटिंग ॲप्सच्या साहाय्याने बदलून लग्न झाल्याचे खोटे फोटो व बदनामीकारक मजकूर पोस्ट करण्यात आला. या पोस्टमुळे तरुणीची सामाजिक बदनामी तसेच तिला गंभीर मानसिक त्रास सहन करावा लागला.

तक्रार दाखल झाल्यानंतर नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांच्या पोलिस टीमने सायबर विभागाच्या सहकार्याने तांत्रिक तपास सुरू केला. इन्स्टाग्राम अकाउंट, आयपी ॲड्रेस व वापरलेले उपकरण शोधण्याच्या प्रयत्नांतून अखेर आरोपीचा शोध लागला.

काही दिवसांच्या तपासानंतर पोलिस हवालदार सचिन वाघमारे आणि विनोद वागणेकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथून आरोपीला ताब्यात घेतले. पोलिस चौकशीत आरोपीची ओळख प्रसाद जगन्नाथ वास्ते अशी समोर आली. तो मूळचा सोलापूर जिल्ह्यातील आहे. सध्या महाड येथे वास्तव्यास असलेला हा युवक उच्चशिक्षित असून इंजिनियर करीत असल्याचे समोर आले आहे. कॉम्प्युटर क्षेत्रातून एआयचे प्रॅक्टीस करीत असून फोटो बनवण्याचे प्रयत्न करीत होता.

मागील दोन वर्षांपासून आरोपी पीडित तरुणीची बदनामी करत होता. खोट्या अकाउंटवरून तिच्या नावाने खोटे फोटो व मजकूर व्हायरल करत होता. इतकेच नाही, तर त्याच घरातील तीन जणांच्या नावाने वेगवेगळी बनावट अकाउंट तयार करून पोस्ट टाकत होता

नेरळ गोळीबार प्रकरणातील फरार आरोपी अखेर जेरबंद

नेरळ : प्रतिनिधी

नेरळ येथील गोळीबार प्रकरणातील फरार आरोपी अविनाश मारके आणि त्याचा साथीदार अखेर पोलिसांच्या तावडीत सापडला. नाशिक पंचवटी पोलिस ठाणे हद्दीत रस्त्यावर मोटरसायकलवरून जात असताना नेरळ पोलिसांनी थेट घेराव घालत दोघांना पकडले. या मारकेवर १५ हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असून तो एका खुनातही फरार होता, त्यामुळे त्याचा शोध राज्यातील विविध पोलिसांकडून सुरू होता. मात्र नेरळ पोलिस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांच्या पथकाने दाखवलेल्या वेगवान कारवाईमुळे अखेर या सराईत गुन्हेगाराला जेरबंद करण्यात यश आले.

नेरळ पोलिस ठाणे हद्दीत, दामत पेशवाई मार्गावर २४ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे १० वाजता सलग दोन गोळ्यांच्या आवाजाने परिसर दणाणून गेला.सचिन अशोक भवर (रा. श्री स्वामी समर्थ संकुल) यांच्यावर मोटरसायकलवरून आलेल्या दोन व्यक्तींनी गोळीबार केला. या घटनेनंतर नेरळ पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे व त्यांच्या टीमने सीसीटीव्ही फुटेज तपासले.त्यात गोळीबार करणारा व्यक्ती पूर्वी फिर्यादी यांच्या नेरळ स्वामी समर्थ चाळीत राहिला होता हे स्पष्ट झाले. मारके सराईत गुन्हेगार आणि अत्यंत धोकादायक असल्याने पोलिसांनी वेळ न दवडता तीन विशेष शोध पथके तयार केली.तांत्रिक आधार आणि गुप्त सूत्रांद्वारे त्याचा मागोवा थेट नाशिकपर्यंत पोहोचला.पोलिसांनी गुप्त कारवाई ठेवत नाशिक पंचवटी पोलिस ठाणे हद्दीत रस्त्यावर मोटरसायकलवरून जाणाऱ्या आरोपींना वेढा घातला.दोघांना खाली खेचून दोघांना अटक करण्यात आली.

मुंबई-पुणे महामार्गावर तीन वाहनांचा अपघात; तिघे जखमी

खालापूर : प्रतिनिधी

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील शिळफाटा यशवंत नगर येथे एका आयसर टेम्पोचे नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील पिकअप आणि कारला जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचा विचित्र असा भीषण अपघात झाला असून या अपघातात तिन्ही वाहनांचे चालक जखमी झाले आहेत

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून आयसर टेम्पो पुण्याकडून माल घेऊन खोपोलीकडे येत असताना तो शिळफाटावरील यशवंतनगर येथे आला असता टेम्पो चालकाचे टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील पीकअप आणि सेलेरिओ कारला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात तिन्ही वाहननांचे चालक जखमी झाले आहेत

अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, हेल्प फाउंडेशनचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल होत जखमींना खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

करिअर मार्गदर्शन आणि तणाव व्यवस्थापन सत्र

रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उपक्रम

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक ५ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते माननीय श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सव वर्ष सोहळ्याचा एक भाग म्हणून मॅनेजमेंट स्टडीज विभागाने कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे 'करिअर मार्गदर्शन आणि तणाव व्यवस्थापन' या विषयावरील तिसरे सत्र

यशस्वीरित्या आयोजित केले होते.

या सत्रात एकूण ७५ विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. हे सत्र व्यावसायिक मार्गदर्शन आणि तणाव व्यवस्थापन यावर केंद्रित होते. मॅनेजमेंट विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. रित ठुले आणि प्रा. स्नेहा नाईक यांनी वाणिज्य आणि विज्ञान शाखांबाबत माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. प्रा. अर्पिता नायक यांनी सत्राच्या शेवटी सर्वांचे आभार मानले त्यांच्याबरोबर श्री. तकदीर दावणे यांनी या सत्रासाठी सहकार्य केले.

या सत्रासाठी प्रमुख वक्त्या म्हणून श्रीमती अंजनी सराफ , जी २० शिखर परिषदेचे माजी वक्ते, तीन संस्थांचे संस्थापक, जीवन प्रशिक्षक आणि गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड धारक, उपस्थित राहून त्यांनी आगामी एच. एस. सी. परीक्षांशी संबंधित प्रमुख तणावाच्या घटकांवर चर्चा केली आणि त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रभावी तंत्रे सुचवली. या उपक्रमासाठी मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रा.निशिगंधा शिंपी ,प्रा. शितल चव्हाण, प्रा. रेहनुमा खान, व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही सहकार्य केले .

स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोग तपासणी शिबिरास महिलांचा प्रतिसाद

मुरुड : प्रतिनिधी

मुरूड जंजिरा मेडिकल असोसिएशन, एमओसी, कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर पनवेल आणि टाटा कॅपिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवस मोफत स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन मुरुड जंजिरा हिंदू एज्युकेशन सोसायटी याठिकाणी करण्यात आले होते.

यावेळी मुरूड जंजिरा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ.संजय पाटील, सचिव डॉ. वसीम पेशीमम ,डॉ.मंगेश पाटील, डॉ.राज कल्याणी, डॉ.मयुर कल्याणी,खजीनदार डॉ.अमित बेनकर एमओसी, मॅमोग्राफी व्हॅन व्यवस्थापक विजय औटी,कॅम्प समन्वयक कर्करोग उपचार समन्वयक स्वप्नील बागल, मॅमोग्राफी टेक्निशियन सोनाली कुडाळकर आणि रुतुषा बामणे, पॅपस्मीअर टेक्निशियन प्रणाली बोराडे, डॉ. सदफ पेशीमम,डॉ.भाविका कल्याणी, डॉ.अनंता जोशी,सुनील पटेल,डॉ.इप्सित पाटील,डॉ. हितेश जैन,डॉ.मकबुल कोकाटे,डॉ.रविंद्र जोशी,डॉ. केतकी पाटील,अंजली पाटील आदिंसह उपस्थित होते.

डॉ.भाविका कल्याणी यांनी महिलांना मार्गदर्शन करते वेळी म्हणाले की ४० वर्षाच्या पुढील महिलांनी दर वर्षी मॅमोग्राफ करणे आवश्यक आहे.जेणे करुन स्तनाचा कर्करोग लवकर शोधण्यास मदत करते यामुळे उपचार सोपे आणि प्रभावी होतात.

शहरासह पंचक्रोशीतील भागातील महिलांना या तपासणी साठी आर्थिक प्रोब्लेम होत असल्याने महिला या आजारा कडे दुर्लक्ष करतात हे दिसुन येत आहेत यांचा विचार करुन मुरुड मेडिकल असोसिएशन यांनी महिलांसाठी ही सुविधा मिळावी महिला सक्षम व तंदुरुस्त असाव्यात या करिता मॅमोग्राफी व्हॅन आणुन महिलांपर्यंत पोहोचणे हेच प्रमुख उद्दिष्ट आहे.मेडिकल असोसिएशन सामाजिक बांधिलकी नेहमीच जपुन अनेक सामाजिक उपक्रम राबवित आहेत डॉक्टर सदफ पेशीमम यांनी महिलांनी रोज रोजच्या व्यायाम व पौष्टिक आहार करावे सांगितले

पान १ वरुन

बहुजन समाजाच्या प्रबोधनाची पायाभरणी महात्मा फुलेंनी केली -अर्थतज्ज्ञ डॉ. मुणगेकर

व्याख्यानमाला समारंभामध्ये एकूण तीन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. त्यात डॉ. अनिलकुमार वावरे आणि डॉ. गौरव पवार यांनी लिहिलेल्या आणि एज्युकेशनल पब्लिकेशन यांनी प्रकाशित केलेल्या 'इमपॉवरिंग फार्मर्स बाय ट्रान्सफॉर्मिंग एग्रीकल्चर द केव्हीके इफेक्ट इन वेस्टर्न महाराष्ट्र' या ग्रंथाचा समावेश होता, ज्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी गटांना कृषी विज्ञान केंद्रांमार्फत जे तंत्रज्ञान व माहिती पुरवून प्रशिक्षण देण्यात आले त्याचा कृषी विकासावर झालेल्या परिणामाचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. सविता मेनकुदळे यांनी लिहिलेल्या 'हिंदी उपन्या स्वामी चित्रात पर्यावरण' या पूजा प्रकाशन, कानपूर यांनी प्रसिद्ध केलेल्या ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात आले, तर कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या घटक महाविद्यालय असलेल्या धनंजय राव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्समधील बिझनेस इकॉनॉमिक्स डिपार्टमेंटचे कॅ. डॉ. राजशेखर मिलोलो यांनी लिहिलेल्या 'इंडियन इकॉनोमिक एन्व्हायरमेंट' या क्रमिक पुस्तकाचेदेखील प्रकाशन या वेळी करण्यात आले.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख समवेत होते.

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आज पारितोषिक वितरण

याशिवाय भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्याचबरोबर बक्षिस वितरण सोहळ्याच्या दिवशी प्रसिद्ध मराठी अभिनेते, दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री त्यांच्या खास शैलीत बहारदार सूत्रसंचालन करणार आहेत. या दिवशी हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट; त्याचबरोबर हास्यसम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे.

महाअंतिम फेरीच्या अनुषंगाने नाट्य एकांकिकांचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, अटल करंडक आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील आणि टीम अटल करंडक यांनी केले आहे.

कोण पटकावणार बहुमानाचा अटल करंडक... उत्सुकता शिगेला

बाराव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सुरू असून यंदाचा बहुमानाचा राज्यस्तरीय अटल करंडक कोण पटकावणार याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागली आहे.

महाअंतिम फेरीच्या शुक्रवारी पहिल्या दिवशी वसंतराव नाईक विज्ञान संस्था नागपूरची एकांकिका 'वि.प्र', मुलुंड वाणिज्य विद्यालय 'स्वातंत्र्य सौभाग्य', मिथक मुंबईची 'कारण काय', एकदम कडक नाट्य संस्था भाईंदरची 'बकेट लिस्ट', वि.ग. वझे विद्यालय मुलुंडची 'द गर्दभ', आर्ट्स कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज साताराचे 'सोयरीक', नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरीची 'प्रतीक्षायान', राजाराम बापू अभियांत्रिकी महाविद्यालय इस्लामपूरची 'हाफ वे', कलादर्पण पनवेलची 'आख्यान-ए-झुरळ' आणि रेवन एंटरटेनमेंट पुणेची 'सांग रहियो' या दहा एकांकिकांचे सादरीकरण होते.

दुसऱ्या दिवशी शनिवारी अभिनय नाट्यकला लोंढे चाळीसगावची 'गाईड', नक्षत्र कला मंच मुंबई 'स्पर्शाची गोष्ट', नाट्यंकुर मुंबई 'पाकिस्तानचे यान', सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे 'थिम्मक्का', साठे महाविद्यालय विलेपार्लेची 'अमिग्डला', अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर 'हॅशटॅग इनोसंट', कलांश थिएटर घाटकोपरची 'मढ निघाले अनुदानाला', कलाकार मंडळी पुणे 'नाटेक', मॉडर्न महाविदयालय गणेश खिंड पुणेची 'वामन आख्यान', स्वभाव कल्याण 'श्री गणेशा' बाबी अमर हिंद मंडळ दादरची 'रेशनकार्ड' या एकांकिकांचे सादरीकरण होते.

अंतिम दिवशी म्हणजे रविवारी रंग पंढरी पुणेची 'बरड', नाट्यऋणी आणि विवेक वाणिज्य महाविद्यालय गोरगावची 'शपथ घेतो की', सीकेटी ठाकूर स्वायत्त महाविद्यालय नवीन पनवेलची 'कीचकवध' आणि डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबईची 'सपान' या एकांकिका सादर होणार आहे.

राज्यभरातील १००हून अधिक एकांकिकांमधून निवड झालेल्या २५ दर्जेदार एकांकिकांची रोमांचक स्पर्धा रंगली आहे. त्यामुळे यंदाचा अटल करंडक कोण जिंकणार याची उत्सुकता अवघ्या महाराष्ट्राला लागली आहे.

विद्युत कर्मचारी संघटनेचे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

मुंबई : प्रतिनिधी

मुंबईत येणाऱ्या अनुयायांसाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने पिण्याचे पाणी व मोफत सुविधा पुरवते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीहि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, बॅकवार्ड क्लासेस सिनियर इंजिनीअर्स ऍड ऑफिसर्स असोसियेशन व स्वतंत्र मजदुर युनियन तर्फे अनुयायांसाठी आरोग्यदायी फेस मास्क, पिण्याचे पाणी बॉटल्स, बिस्कीट व अल्पोपहार यांचे मोफत वितरण दादर येथील शिवाजी पार्क मैदान येथे स्टॉल उभारून करण्यात आले.

दिनांक ६ डिसेंबर रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉक्टर संजय घोडके यांच्या हस्ते वितरणास सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी महापारेषण चे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, जनसंपर्क अधिकारी मिलिंद अवताडे यांच्यासमवेत मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस संजय मोरे, जीवन गायकवाड, उपसरचिटणीस अश्रुवजित गायकवाड, उपाध्यक्ष शैलेश आडे, मधुकर कांबळे आदी केंद्रीय पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून विशेष सहभाग

नोंदविला. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून गेल्या पंधरा वर्षांपासून सातत्याने सुरु असलेला बाटलीबंद शुद्ध पिण्याचे पाणी, आरोग्यदायी फेस मास्क व अल्पोपहार मोफत वितरणाचा हा स्तुत्य उपक्रम म्हणजे बंधुत्व जपणारा व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणाराच आहे. या उपक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी संघटनेच्या मुख्य कार्यालय शाखेचे अध्यक्ष गौतम कांबळे, सचिव पंकज बोरकर, संघटक सुमेध कोसोदे, कोषाध्यक्ष रंजना खैरे, रविकिरण जांभरूनकर, संजय भगत, अविनाश बोरकर, निशिगंधा बनकर, ममता कंठे, रोहण मूडशिंगीकर, आनंद गायकवाड, संतोष गवई, निशांत कांबळे, कुमारी अरिया बोरकर, विशाखा बोरकर, संदीप धाबर्डे, विकास कांबळे, प्रणय जांभूळकर, विक्की सोलंकी, सुशांत सावंत, निखिल खैरे, किमया खैरे, हर्षित खैरे आदी पदाधिकारी व सदस्यांनी विशेष सहकार्य केले.

पळसदरीच्या श्री स्वामी समर्थ मठात सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान

कर्जत : प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे श्री दत्त जयंती उत्सव हर्षोल्हासात साजरा झाला. यावेळी हजारो भाविकांनी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. श्री दत्तजयंतीनिमित्त पहाटेपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्त्यांना ' आठवण ' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान नेत्रदानासाठी जनजागृती करणारे आणि नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे आणि अभिनया बरोबरच गेली वीस वर्षे पनवेलच्या शांतीवन आश्रमात

वयोवृद्ध आजी आजोबा व कुष्ठरोगी रूग्णांना दिवाळी भेट देवून दिवाळी साजरी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या, प्राणीमित्र सुप्रसिद्ध अभिनेत्री जुई गडकरी यांना श्री स्वामी समर्थ परिवारातर्फे ' आठवण ' पुरस्कार देण्यात आला. शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र हे पुरस्काराचे स्वरूप होते.

श्री दत्त गुरूंचा जन्मोत्सव,पालखी सोहळा ,रात्री आरती व महाप्रसादानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी पहाटे पासून रात्रीपर्यंत हजारो भाविक भक्तांनी स्वामी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी विक्रांत दरेकर, राजू पोतदार, दिलीप पांडे, वत्सला वांजळे आदींसह ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोहोपाड्यात तुकाराम गाथा पारायण, अखंड हरिनाम सप्ताह

मोहोपाडा : प्रतिनिधी

ब्रम्हलीन हभप गुरुवर्य बाळाराम महाराज कांबेकर यांच्या कृपाआशीर्वादाने वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ, रसायनी पाताळगंगा आयोजित श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सुवर्ण जन्मोत्सव तपपूर्ती सोहळानिमित्त श्री तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह मोहोपाडा येथील जनता विद्यालय मैदानावर आयोजित करण्यात आला आहे.हा सप्ताहात दिपोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला,यावेळी रसायनी पंचक्रोशीतील वारकरी सांप्रदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या सप्ताहात प्रवचन, हरिपाठ तसेच सायंकाळी ७ ते ९ वाजता सुप्रसिध्द महाराजांची किर्तने झाली.तर

काल्याचे किर्तन हभप राम महाराज सोलापूरकर (जोग महाराज) यांच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.यावेळी सोलापूरकर महाराजांचे सरपंच उमाताई मुंढे व त्यांचे पती माजी सरपंच संदिप मुंढे यांनी महाराजांचे पुष्पहार घालून अभिवादन करीत आशिर्वाद घेतले.या सप्ताहासाठी वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी पाताळगंगा , खालापूर व पनवेल तालुका यांनी अथक परिश्रम घेतले.

भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते

खुटारी रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल महापालिका हद्दीतील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सुविधा मिळाव्यात या उद्देशाने खुटारी येथील रस्त्याचे काँक्रिटीकरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा वार्षिक योजनेतून करण्यात येणार आहे.

भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. पनवेल महापालिका हद्दीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकासाची कामे मगरी लागत असून नागरिकांचा चान्गल्या दर्जाच्या सुविधा उपलब्द होत आहेत. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा वार्षिक योजनेतून खुटारी येथील रस्तयांच्या काँक्रीटीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. खुटारी येथील गंगाराम म्हात्रे ते परशूराम म्हात्रे यांच्या घरापयरतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण केले जाणार आहे. हे काम २६ लाख २९ हजार ७७७ रुपये निधीतून पूर्ण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन अरुणशेठ भगत यांच्याहस्ते शनिवारी झाले.

यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर,नंदकुमार म्हात्रे, प्रभाग क्रमांक च्या अध्यक्षा लीना म्हात्रे, बूथ अध्यक्ष हरिश्चंद्र म्हात्रे, माजी सरपंच संतोष पाटील, प्रभाग क्रमांक चे अध्यक्ष दीपक पाटील, सरचिटणीस रमेश मढवी, नरेश म्हात्रे, नेहाल ठाकूर, मंगेश ऐनकर, अंकुश पाटील, अभिमन्यू पोरजी, विजय म्हात्रे,निवृत्ती म्हात्रे, किशोर म्हात्रे, संतोष म्हात्रे, गणेश म्हात्रे, निकेश म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून सिद्धी देशमुखचा सत्कार

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल शहरातील मेहनती आणि विलक्षण प्रतिभावान सिद्धी विश्वास देशमुख हिनेतिच्या कलेच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावरील सर्वात प्रतिष्ठित रिॲलिटी शो इंडियाजगॉट टॅलेंट सीझन ११पर्यंत मजल मारत पनवेल शहराचा मान अभिमानानेउंचावला आहे.

द्रोण आर्चरी अकादमीच्या तिच्या सहकाऱ्यांसह सिद्धीने दिलेला थरारक, अचूक आणि अद्वितीय आर्चरी परफॉर्मन्स आर्ट संपूर्ण देशाला मोहितकरणार असून, तिच्या या यशामुळे पनवेलकरांमध्येही आनंद व अभिमानाची भावनाआहे. सिद्धीच्या याच उल्लेखनीय यशाची दखल घेत पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी तिला पनवेलमधील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आमंत्रित करून तिचा सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामगार नेते रवी नाईक तसेच सिद्धीचे वडील विश्वास देशमुख उपस्थित होते.

आमदार ठाकूर यांनी सिद्धीचे कौतुक करताना म्हटले की, पनवेलच्या मातीतून अशीकला आणि कौशल्य घेऊन राष्ट्रीय पातळीवर पोहोचणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. सिद्धीने केवळ आपल्या कुटुंबाचे नव्हे तर संपूर्ण पनवेलचे नाव उज्वलकेले आहे. तिच्या भावी कारकिर्दीसाठी आम्ही मनपूर्वक शुभेच्छा!

वाजेकर विद्यालयात एड्सविषयी जनजागृती

उरण : वार्ताहर

रयत शिक्षण संस्थेच्या उरण येथील वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागातील टी.वाय.बी.एस्सी. विद्यार्थिनी कुमारी हर्षदा महाकाल यांनी तुकाराम हरी वाजेकर हायस्कूल, फुंडे येथे जागतिक एड्स दिन निमित्त जनजागृती कार्यक्रमात संसाधन व्यक्ती म्हणून काम पाहिले व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

या विस्तार उपक्रमातून ११वी, १२वी तसेच हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना एड्सविषयी महत्त्वपूर्ण माहिती, जनजागृती आणि गैरसमज दूर करण्या साठी संदेश देण्यात आला. हर्षदा महाकाल यांनी एड्सचे मूलभूत ज्ञान, प्रतिबंध आणि संवेदनशीलतेची गरज याबद्दल मार्गदर्शन केले.

नावडे बस स्टॉपचे उद्घाटन

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल महापालिका हद्दीतील नावडे येथे नागरिकांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक बस स्टॉपचे उद्घाटन शनिवारी भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. हा बस स्टॉप पनवेल महापालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आला असून, त्यासाठी भाजपचे उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर यांनी नावडे येथे नवीन बस स्टॉपउभारण्यासाठी महापालिकेकडे मागणी केली होती. त्यांच्या प्रयत्नाना यश आले असून, आता हा सुसज्ज बस स्टॉप नागरिकांच्या सेवेत दाखल झाला आहे.

उद्घाटन सोहळ्याप्रसंगी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, महेश पाटील, वासुदेव पाटील, राम पाटील, अशोक साळुंखे, भरत खानावकर, अंकुश पाटील, बळीराम खानावकर, रवींद्र खानावकर,नकुल जोशी, रवींद्र खानावकर, विशाल खानावकर, विनोद खानावकर, भूपेश खानावकर, संकेत खानावकर, विनीत खानावकर, सागर भोईर, शंकर वगैरे, राजेश पाटील, प्रताप चव्हाण,अभि खानावकर, सुशांत खानावकर, विशाल खानावकर,धीरज खानावकर, प्रथमेश खानावकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. नावडे परिसरातील प्रवाशांना दिलासा मिळाला असून, यामुळे सार्वजनिक वाहतूक अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

गव्हाण विद्यालयात पालक सभा

◆ चेअरमन अरुणशेठ भगत यांची उपस्थिती

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये एस.एस.सी.परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ या बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा शुक्रवार दि.५ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयतचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी,गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजयशेठ घरत,विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,दहावीचे वर्गशिक्षक प्रशांत परदेशी, संदिप भोईर आदी उपस्थित होते.

या वेळी इयत्ता दहावीच्या तिन्ही वर्गांच्या प्रथम सत्र परीक्षेच्या निकालाचे वाचन करून पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगती बाबत अवगत करून गुणवृद्धीसाठी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

सदर पालकमेळाव्याचे अध्यक्ष व विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत साहेबांनी या तीनही वर्गांच्या निकालाचे अवलोकन करून विद्यालयात वर्गात प्रथम तीन क्रमांकांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी तिन्ही वर्गातून प्रथम आलेला विद्यार्थी यश दत्तात्रय जाधव याचे आणि त्याच्या पालकांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. तर शैक्षणिक दृष्ट्या अप्रगत असलेल्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना वैयक्तिक रित्या मार्गदर्शन करत दहावीचं वर्ष हे पुढील करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने अभ्यासाची गती आणि प्रगती विषयी सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी पालकांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत पाल्यांच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. या पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी तर आभार देवेंद्र म्हात्रे यांनी मानले.

पेठ गावासमोरील रस्त्याच्या डांबरीकरण कामाला सुरुवात

पनवेल : रामप्रहर वृत्त

खारघर प्रभाग क्रमांक ३ अंतर्गत सेक्टर ३३ व २७ परिसरातील पेठ गावासमोरील रस्ता गेल्या अनेक दिवसांपासून दुरावस्थेत होता. खड्ड्यांनी पोखरलेला रस्ता, उडणारी धूळ व असुरक्षित वाहतूक यामुळे येथील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत जनप्रतिनिधींनी पुढाकार घेतला असून अखेर या रस्त्याच्या डांबरीकरण आणि सुशोभीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, सरचिटणीस उत्तर पनवेल विनोद कृष्णा घरत, उपाध्यक्ष उत्तर पनवेल निर्दोष केणी, तसेच प्रभाकर जोशी यांनी पनवेल महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळताच महानगरपालिकेने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले.

यावेळी चिटणीस उत्तर पनवेल जयदास तेलावणे, सचिन वास्कर, प्रमोद पाटील, रोशन घरत आदी मान्यवर उपस्थित होते. या जनप्रतिनिधींच्या सक्रिय सहकार्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेला रस्तादुरुस्ती प्रश्न मार्गी लागला आहे.

सध्या रस्त्याच्या डांबरीकरणासोबत सुशोभीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू असून काही दिवसांत संपूर्ण मार्ग सुरळीत होण्याची अपेक्षा आहे. रस्त्याच्या दुरुस्तीनंतर स्थानिक नागरिकांनी दिलासा मिळाला आहे. सोसायटीच्या सर्व रहिवाशांनी प्रत्यक्ष भेट घेऊन जनप्रतिनिधींचे आभार मानले.

पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेल भाजपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आमदार आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक संतोष भोईर, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, प्रीतम म्हात्रे, प्रकाश खैरे यांच्यासह कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

दिव्यांग जनजागृती रॅलीमधील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

पनवेल : वार्ताहर

दिव्यांग जनजागृती रॅलीमधील विद्यार्थ्यांना पनवेल शहर वाहतूक शाखे तर्फे खाऊचे वाटप करण्यात आले.

नवीन पनवेल विभागामध्ये रोटरी क्लब आयोजित दिव्यांग जनजागृती रॅलीसाठी सहभागी मुला-मुलींना प्रोत्साहन म्हणून पनवेल शहर वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील साहेब यांच्या सहकार्याने आदई सर्कल नवीन पनवेल या ठिकाणी दिव्यांग रॅली आल्यानंतर ५० ते ६० दिव्यांग मुलांसाठी कॅडबरी व पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आल्या.

या उपक्रमामुळे दिव्यांग मुलांमध्ये उत्साह आपुलकीची भावना निर्माण झाला असून हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे.

नवनीत चित्रकला स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची चमक

पनवेल : रामप्रहर वृत्त

नवनीत तर्फे दरवर्षी चित्रकला स्पर्धा ही शालेय विद्यार्थ्यासाठी आयोजित करण्यात येते. या स्पर्धेत सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता .त्यामध्ये गट क्रमांक ब मध्ये खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिक मिळविले.

प्रथम क्रमांक - दूर्वा संदीप पाटील (६वी) द्वितीय क्रमांक - रेवती अनभुले (६वी) तृतीय क्रमांक- तनिष्का नितीन देवडकर (६वी) तसेच

गट क्रमांक क मध्ये खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिक मिळविले. प्रथम क्रमांक- संस्कृती जनार्दन भोपी (७वी) द्वितीय क्रमांक - अन्विता विनोद कांबळे (७वी) तृतीय क्रमांक - स्वरा रायगुडे (७वी).

या विद्यार्थ्यांना विद्यालयातील चित्रकला शिक्षक श्री .महेश पोपेटा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले . सदर विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संतोष चव्हाण सर , पर्यवेक्षिका नीरजा अदुरी मॅडम , सर्व शिक्षक यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

काही पुरस्कार मानाचे, तर काही शोभेचे (तेही हवेत)

वर्ष २०२५ संपता संपता मराठी चित्रपटसृष्टीसाठी एक अतिशय सकारात्मक चांगली बातमी आली. पणजी, गोवा येथे आयोजित करण्यात आलेल्या भारताच्या ५६व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी)मध्ये 'गोंधळ' या मराठी चित्रपटाने 'सिल्व्हर पिकॉक इंटरनॅशनल सेक्शन'मध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार पटकावला आहे. गेल्या ५६ वर्षांत पहिल्यांदाच मराठी चित्रपटाला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकचा अवॉर्ड मिळाल्याने हा विजय अधिकच ऐतिहासिक ठरला आहे.

यंदा 'इफ्फी'मध्ये ११३०चित्रपटांची नोंदणी करण्यात आली होती. त्यातील ५७० फिचर फिल्म्स होत्या. त्या चित्रपटांमधून हा सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा अवॉर्ड 'गोंधळ'ला मिळाला असून पंधरा लाख रुपये रोख आणि मानांकन असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा सोहळा गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू, माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव, दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत, ऋषभ शेट्टी, रणबीर सिंग, नवाजुद्दीन सिद्दीकी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

२०१९ साली 'जल्लीकट्टू' या चित्रपटाच्या लिजो जोस यांना सिल्व्हर पिकॉक सेक्शनमध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकासाठी अवॉर्ड मिळाला होता. त्यानंतर कोणत्याही भारतीय चित्रपटाला सिल्व्हर पिकॉक सेक्शनमध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा अवॉर्ड मिळाला नव्हता. संतोष डावखर यांचे दिग्दर्शकीय पदार्पण असतानाही त्यांना थेट सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा अवॉर्ड मिळाला आहे.

हा चित्रपट आपल्या मातीत रुजलेल्या श्रद्धा, लोकपरंपरा आणि मानवी भावना यांचं प्रभावी चित्रण करतो. नवरा-नवरीच्या आयुष्यातील विघ्नं दूर करण्यासाठी साजऱ्या होणाऱ्या 'गोंधळ' या पारंपरिक विधीच्या पार्श्वभूमीवर उभी राहाणारी कथा केवळ धार्मिक विधीपुरती मर्यादित न राहाता अंधश्रद्धा, कुटुंबातील नात्यांचे संघर्ष, समाजात बदलणारे दृष्टिकोन आणि माणसांच्या मनात दडलेला रहस्याचा धागा यांचाही वेध घेते. 'गोंधळ'ची कथा, पटकथा, संवाद, दिग्दर्शन संतोष डावखर यांनीच केले असून डावखर फिल्म्स निर्मित या चित्रपटाच्या सहनिर्मात्या दीक्षा डावखर आहेत. किशोर कदम, इशिता देशमुख, योगेश सोहोनी, निषाद भोईर, अनुज प्रभू, सुरेश विश्वकर्मा, माधवी जुवेकर, ऐश्वर्या शिंदे, कैलाश वाघमारे, प्रभाकर मठपती, विठ्ठल काळे, प्रवीण डाळींबकर, शरद जाधव, पूनम पाटील आणि ध्रुव ठोके या कलाकारांची फळी या चित्रपटात आहे.

असा पुरस्कार मराठी चित्रपटसृष्टीसाठी उत्साह वाढवणारी बातमी आहे. विशेषतः मनोरंजनाची चौकट सांभाळून काही वेगळे करु इच्छिणाऱ्या निर्माते, पटकथा संवाद लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार यांच्यासाठी ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे.

याच वर्षी साठाव्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात सई ताम्हणकरला सचिन कुंडलकर दिग्दर्शित 'पॉन्डेचरी' चित्रपटासाठी आणि अमृता खानविलकरला प्रसाद ओक दिग्दर्शित 'चंद्रमुखी' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार प्राप्त झाला हेदेखील विशेष उल्लेखनीय, कारण त्या प्रामुख्याने ग्लॅमरस अभिनेत्री म्हणून लोकप्रिय आहेत, पण त्यांच्या अभिनयावर शिक्कामोर्तब होण्याची गरज होती. ती यातून पूर्ण झाली. या सोहळ्याच्या वेळी अमृता खानविलकर अमेरिकेत आपल्या नृत्याच्या कार्यक्रमाचा मनसोक्त मनमुराद आनंद घेत होती तरी तिचं लक्ष मुंबईतील या पुरस्कार सोहळ्याकडे होते. यालाच आपल्या कामावरचे प्रेम म्हणतात.

एक छोटीशी आठवण करून देतो, आजा रे परदेसी (मधुमती १९५८), कहीं दीप जले कहीं दिल... (बीस साल बाद १९६२), तुम्ही मेरे मन्दिर तुम्ही मेरी पूजा (खानदान १९६५) आणि आप मुझे अच्छे लगने लगे (जीने की राह १९६९) या चार फिल्म फेअर पुरस्कारानंतर लता मंगेशकर यांनी जाहीर केले, यापुढे या पुरस्कारासाठी आपल्या नावाचा विचार करण्यात येऊ नये; अन्य कोणाला तरी हा पुरस्कार प्राप्त व्हावा. आणि हे पथ्य पाळले गेले. यात त्यांची एक प्रकारची या पुरस्काराबाबतची तृप्तता दिसते, समाधान दिसते.

धर्मेंद्रला यशस्वी कारकीर्दीच्या तब्बल पन्नास वर्षांनंतर फिल्म फेअरने जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले तेव्हा हा पुरस्कार स्वीकारताना तो अतिशय भावूक होत म्हणाला, आपल्याला आयुष्यात कधीच कोणताच पुरस्कार प्राप्त झाला नाही. याचे कारण, मी त्या पठडीतील अभिनय कधीच केला नाही. आणि मी जे काही रुपेरी पडद्यावर करत आलो त्याला समिक्षकांनी आणि परीक्षकांनी कधीच गांभीर्याने घेतले नाही. धर्मेंद्रच्या या बोलण्यात स्वतः कडे पाहण्याचा तटस्थपणा आणि दुःख दिसत आहे. या गोष्टीची नुकतीच चर्चा झाली हे वेगळे सांगण्याची गरज नाही. अजिंक्य देवची लक्षवेधक भूमिका असलेल्या राजदत्त दिग्दर्शित 'सर्जा' (१९८७) या चित्रपटाला राज्य चित्रपट महोत्सवात एकाही विभागात पुरस्कार प्राप्त न झाल्याने या चित्रपटाचे निर्माते व अभिनेते रमेश देव अतिशय रागावले, व्यथित झाले आणि त्यांनी मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांसमोर आपली ही नाराजी व्यक्त केली. आपण अतिशय मेहनतीने साकारलेल्या या ऐतिहासिक कलाकृतीला पूर्णपणे डावलल्याचे दुःख त्यांच्या बोलण्यात जाणवत होते. (राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मात्र 'सर्जा'ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा रौप्य कमळ पुरस्कार प्राप्त झाला.) असं का घडते? अमृता राव निर्मित आणि सुजय डहाके दिग्दर्शित 'श्यामची आई' या चित्रपटाला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले पण राज्य चित्रपट महोत्सवात हा चित्रपट पूर्णपणे डावलला गेला.

आपल्या लक्ष्मीकांत बेर्डेला राज्य चित्रपट महोत्सवात 'घोळात घोळ' (१९८७) मधील अभिनयासाठी उत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार प्राप्त झाल्याने त्याला आश्चर्य वाटले होते, तर डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'एक होता विदूषक' (१९९२) या चित्रपटातील अभिनयासाठी नामांकन होते पण पुरस्काराने हुलकावणी दिल्याने लक्ष्मीकांत बेर्डे आपली नाराजी कधीच लपवू शकला नाही. ही गोष्ट त्याने फारच मनाला लावून घेतली होती. बरेच दिवस तो याबाबत नाराज होता. आणि तो ते बोलूनही दाखवलं असे.

आपल्या भरत जाधवला 'झिंग चिक झिंक' (२००९) यातील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राज्य चित्रपट महोत्सवात पुरस्कार प्राप्त झाल्यावर एकदा मला तो म्हणाला, मी चित्रपटात भूमिका साकारायला सुरुवात केल्यावर पंचवीस वर्षांनी माझ्यासाठी हा योग आला. त्याच्या बोलण्यात मला असं जाणवलं की, मी दर्जेदार अभिनय करतो यावर इतक्या वर्षांनंतर परीक्षकांना विश्वास बसला.

.... चित्रपट पुरस्कारांचे महत्व यातून अधोरेखित होतेय. यात एक प्रकारचे हळवेपण होते. आता काळ बराच बदललाय. ऑस्कर, राष्ट्रीय चित्रपट, राज्य चित्रपट महोत्सव, भारताचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यासह बरेच चित्रपट पुरस्कार आहेत. त्याचे रंगतदार सोहळे आहेत. रेड कार्पेटवर चमकणे, चकाकणे आहे. एक प्रकारची ती देखणी फॅशन परेड असते. त्यात झटपट पटपट मुलाखती असतात.

आज वर्षभर सतत कोणता ना कोणता चित्रपट पुरस्कार सोहळा सुरुच असतो. ते पुरस्कार मागील वर्षासाठीच्या सिनेमासाठी आहेत की या वर्षीच्या चित्रपटासाठी आहेत यातील फरक बराचसा संपुष्टात आला आहे. याची लागण दशकभरापूर्वीच झालीय. 'पुरस्कारशिवाय कोणीही राहू नये' असाच त्यामागे उदात्त विचार असूही शकतो. (कोरोनामुळे पुरस्कार टाईम टेबल बिघडले असे कोणीही बोलू नये. तत्पूर्वीच 'इकडे पुरस्कार प्राप्त झाला नाही तर तिकडे निश्चित' असा सकारात्मक दृष्टिकोन विकसित झालाय.)

दादासाहेब फाळके यांच्या नावाने भारत सरकारचा अतिशय प्रतिष्ठित असा मानाचा पुरस्कार असूनही अनेक संस्थानी त्या नावाने 'पुरस्कार जल्लोष' सुरू केलाय आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर तो स्वीकारत आहेत. पुरस्कार सज्ञानता आवश्यक आहे का हो? तर होय. दादासाहेब फाळके पुरस्कार एकच असावा आणि अर्थातच तो भारत सरकारच्या वतीने देण्यात येणारा तोच असावा. त्याला प्रतिष्ठा व विश्वासार्हता आहे. अतिशय मानाचा असा तो पुरस्कार आहे.

चित्रपटाच्या जोडीला मालिका, गेम शोज, रिलिटी शोज, अल्बम, वेबसिरिज ,सोशल मिडियात रिल, फिटनेस, आकर्षक लूक, फॅशन फंडा यांचीही चर्चा वाढल्याने पुरस्कार संख्याही वाढलीय. त्यात जाहिरातपट, उत्तम फोटो सेशन, सोशल मिडिया पोस्ट, इव्हेन्टसमधील ड्रेस असेही पुरस्कार सुरु व्हावेत. पुरस्कार कोणाला नकोत? अशी संख्या वाढताच अधिकाधिक जण खुश होतील. उत्तम फोटोजेनिक व्यक्तीमत्व म्हणून पूजा सावंतची निवड निर्विवाद. तिचा प्रत्येक फोटो मागच्यापेक्षा अधिक सरस आणि देखणा असा.

अशा पध्दतीने वर्षभरची हुकमी गोष्ट म्हणजे, मनोरंजन क्षेत्रातील पुरस्कार पुराण. हे पीक का आले? अनेक शहरांतील लहान मोठ्या संस्था, माध्यम समूह यांच्या वार्षिक उलाढालीत 'इव्हेन्टस'ला महत्व आहे. त्यासाठी आर्थिक उलाढाल आपोआपच वाढली. तो खर्च करण्याची तयारीही आहे. आज सगळाच मामला दिखाऊपणा महत्वाचा असा आणि आपणच दिसायला हवे ही इच्छा असलेला. तर मग हे चालणारच. त्यात काही चित्रपट पुरस्कार वेगळे. गोंधळ या चित्रपटाला तोच मिळाला आहे. तर हे चित्रपट पुरस्कार मनोरंजन वाहिन्यांसाठी एक ग्लॅमरस टी. व्ही. शो असतो. अनेक सेलिब्रिटीजना आपला परफॉर्मन्स खुलवायची संधी वाढली. (पुरस्काराच्या बदल्यात एक डान्स अथवा एका परफॉर्मन्सची परतफेड म्हणून पुरस्कार अशीही देवाणघेवाण असते म्हणे. विद्या बालनने यावरुन शाहरुख खानला अशाच एका इव्हेन्टसमध्ये खोचक प्रश्न विचारलाच. यू ट्यूबवर आहे बघा.काय भारी दृश्य आहे बघा.), अनेक सेलिब्रिटीजना फॅशनेबल ड्रेसमध्ये वावरायची संधी आणि या सगळ्यावर फिल्मी मीडियाचा भारी फोकस. रिल आणि गॉसिप्स जणू हातात हात घालून चालतात. असो.

एक ताजी बातमी, मकरंद देशपांडे, मुरली शर्मा, सई ताम्हणकर, भाऊ कदम व सिद्धार्थ जाधव यांच्यासह कुमार शानू यांना २५वा नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार प्रदान करण्यात आले. ही आठवड्यापूर्वीची बातमी.

पुरस्कारांचा बाराही महिने शो सुरु असल्याने सेलिब्रिटीजच्या भेटीगाठीची संधी वाढलीय अन्यथा आज एकमेकांना भेटायला वेळ आहे कुठे? सेटवर दिग्दर्शक ओ.के. म्हणताच जो तो आपापल्या व्हॅनिटीत बंद. बाहेरच्या जगाशी संबंध तो काय आणि कशाला? ही कोंडी इव्हेन्टस फोडतेय. अशातच जीवन गौरव पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे कौतुक करायचीही संधी. (वाढत्या पुरस्कारांमुळे कदाचित या पुरस्कारासाठी वयाची अलिखित मर्यादा थोडी कमी करावी लागेल का हो?)

एखाद्या गोष्टीची वाढ काही चांगल्या गोष्टी, काही नवीन कल्पना तर काही अनावश्यक गोष्टी घेऊन येते. पुरस्कार वाढीत ते सगळेच आहे. म्हणूनच 'मानाच्या पुरस्कारां'चे महत्त्व आणि विश्वासार्हता टिकून राहील... पुरस्कार कलाकाराचा हुरुप वाढवतो. आत्मविश्वास वाढवतो. आपण जिंकलोय असा अभिमान, स्वाभिमान जागा करतो. यासाठी पुरस्कार हवाच. जीवन गौरव पुरस्कार तर वयाच्या साठीच्या आसपास मिळावा. त्यामुळे पुन्हा चार्ज झाल्यासारखे वाटते. नवीन ऊर्जाच तर त्यातून मिळते. म्हटले ना, काही पुरस्कार मानाचे, काही घ्यायचे तर काही शोभेचे असतात...

झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन

भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन भारतात दरवर्षी ७ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवशी त्या शहीद आणि शूर सैनिकांचा सन्मान केला जातो, ज्यांनी देशाच्या रक्षणासाठी शत्रूंशी लढा दिला आणि देशाच्या नावावर सर्वस्व अर्पण केले. त्याचप्रमाणे हा दिवस शहीद आणि देशाच्या रक्षणासाठी आपला जीव गमावलेल्या सैनिकांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. या दिवशी शहीद सैनिकांना देशवासीय श्रद्धांजली वाहतात.

सैनिक हे कोणत्याही देशाच्या महान संपत्तींपैकी एक असतात आणि ते देशाला सुरक्षित व एकत्रित ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. भारतीय सशस्त्र सेना ध्वजदिन अनेक वर्षांपासून भारतीय सैनिक, नौदल आणि हवाई सैनिकांना श्रद्धांजली म्हणून साजरा करण्याची परंपरा आहे. भारतीय सैन्य दल, भारतीय वायु सेना आणि भारतीय नौसेना या सशस्त्र सैन्याच्या तीन शाखा राष्ट्रीय सुरक्षेच्या दिशेने केलेले प्रयत्न दाखवण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करतात. भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन का साजरा केला जातो. त्याचा इतिहास काय आहे? याची या लेखात संपूर्ण माहिती मिळेल.

देशाच्या सीमांचे रक्षण तीन सैन्य (नौदल, लष्कर आणि हवाई दल) करतात. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ११ नोव्हेंबर हा दिवस स्मरण दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जात असे. त्या दिवसाला पॉपी डे असेसुद्धा म्हणत. स्मरण दिनास निधी देणाऱ्यास कागदी शोभेची फुलझाडे देण्यात येत असत. त्या काळातील माजी ब्रिटिश सैनिकांबरोबरच भारतीय सैनिकसुद्धा हा निधी वापरू शकत होते, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या संरक्षण मंत्रालयाला ही प्रथा अयोग्य वाटल्याने त्यांनी अशा निधीचे संकलन एका विशिष्ट दिवशी करण्यात यावे व त्याचा विनियोग माजी सैनिक व सेवेतील सैनिकांसाठी व्हावा असा निर्णय जुलै १९४८मध्ये घेतला गेला. २८ ऑगस्ट १९४९ या दिवशी संरक्षण मंत्रालयाच्या समितीने ७ डिसेंबर या दिवशी ध्वजदिन साजरा केला जाईल असे ठरविले.

भारत सरकारने भारतीय लष्करातील सैनिकांच्या कल्याणासाठी समिती स्थापन केली. या समितीनं लोकांमध्ये छोटे झेंडे वाटून निधी गोळा करण्यात आला. हा ध्वज तीन रंगांचा होता. यात लाल, हिरवा आणि निळा), हे रंग असून हे तिन्ही रंग सैन्यांचे प्रतीक आहेत. यादिवशी देशातील जनता व इतर सामाजिक संस्था ध्वजनिधी जमा करतात. या निधीचा वापर देशाचे रक्षण करीत असताना धारातीर्थी पडलेल्या वीर जवानांच्या, पत्नींच्या व मुलांच्या, माजी सैनिकांच्या कल्याणासाठी केला जातो. जिल्हा सैनिक बोर्ड शाळा, कॉलेज व विविध संस्थांच्या मदतीने निधीची रक्कम गोळा करते. निधी देणारांना लाल, निळा व गडद निळ्या रंगांमध्ये असलेले कागदाचे टोकन फ्लॅग दिले जातात. फ्लॅगचे हे तीन रंग म्हणजे जिल्हा सैनिक बोर्ड, राज्य सैनिक बोर्ड व केंद्रिय सैनिक बोर्ड यांचे प्रतीक आहेत.

ध्वजांच्या माध्यमातून देणगी गोळा करण्यामागे समितीचे तीन मुख्य उद्देश होते. प्रथम, युद्धादरम्यान झालेल्या जीवितहानीवर सहकार्य करणे. दुसरे म्हणजे, लष्करी जवान आणि त्यांच्या कुटुंबियांचे कल्याण आणि समर्थन करणे आणि तिसरे म्हणजे, सेवानिवृत्त जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांचे कल्याण करणे.

देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे की ते फक्त शहीद आणि जिवंत वीरांचे (कर्तव्य बजावताना जखमी झालेले) कौतुक न करता त्यांच्या कुटूंबातील महत्त्वाचा भाग बनू शकतील. भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन प्रामुख्याने सैनिक आणि त्यांचे कुटुंब, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी आहे. हा दिवस युद्धात शहीद आणि जखमी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी साजरा केला जातो. यामुळे युद्धात देशासाठी बलिदान देणाऱ्या जखमी सैनिक, वीर स्त्रिया आणि शहीदांच्या कुटुंबियांची काळजी घेण्याची आमची वचनबद्धता पुढे आली आहे.

हा दिवस आपल्या देशातील सर्व सैनिकांसाठी आहे, जे कोणत्याही किमतीत देशातील नागरिकांचे रक्षण करतात. आपल्या मातृभूमीच्या सेवेसाठी आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या अशा वीरांचा देशातील प्रत्येक नागरिक नेहमी ऋणी असतो. देशवासीयदेखील एकमेकांना भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिनाच्या शुभेच्छा देतात. (साभार : इंटरनेट)

ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक विनय आपटे

ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक, निर्माते, अभिनेते आणि मराठी रंगभूमीवरील अष्टपैलू व्यक्तीमत्व विनय आपटे यांचा आज स्मरण दिन. ७ डिसेंबर २०१३ रोजी त्यांचे निधन झाले होते.

विनय आपटे यांचा जन्म १७ जून १९५१ रोजी झाला. त्यांनी १९७४पासून अभिनयाला सुरुवात केली. ते हे एक अभिनेता म्हणून नव्हे तर दिग्दर्शक होते. त्यांनी निर्मित्याची भूमिका बजावली आहे. अभिनयात विनय आपटे यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. विजय तेंडुलकरांनी लिहलेल्या मित्राची गोष्ट यासह असंख्य नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले होते. त्यांच्या दिग्दर्शकीय कारकीर्दीचीच ती सुरूवात होती. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत असंख्य नाटकांचं दिग्दर्शन केलेल्या विनय आपटे यांना मित्राची गोष्ट हे त्यांच्या कारकीर्दीतलं सर्वांत महत्त्वाचं नाटक वाटतं. मराठी नाटक, चित्रपटांसह हिंदीमधील सत्याग्रह, इट्स ब्रेकिंग न्यूज, चांदनी बार, एक चाळीस की लास्ट लोकल आदी हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले होते. तर झी मराठीच्या एका लग्नाची दुसरी गोष्ट या मालिकेत अफलातून भूमिका साकारली होती.

मुक्ता बर्वे हिच्या वडिलांची भूमिका केली होती. ही भूमिका घराघरात पोहोचली होती. विनय आपटे यांच्या मगणरंगफ या नाट्यसंस्थेचे व्यवस्थापक होते. मडॅडी आय लव्ह यूफ, मतुमचा मुलगा करतो काय? आदी नाटकांसाठी त्यांनी व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. मकमलीचं काय झालं? हे त्यांचे व्यवस्थापक म्हणून शेवटचे नाटक ठरले. १९७४पासून दूरदर्शनमध्ये कामास सुरुवात. रंगभूमी, दूरचित्रवाणी आणि सिनेमा या तिनही प्रकारात विनय आपटे यांचा विशेष ठसा होता. आपली अशी वेगळ्या धाटणीची ओळख निर्माण केली होती.

कोणतीही भूमिका साकारताना एका वेगळ्याच स्टायलीत संवादफेक ही त्यांच्या अभिनयाची विशेष बाब होती. त्यांच्या आवाजात भारदस्तपणा होता. विनय आपटे यांनी कॉलेजमधून एकांकितेतून रंगभूमीवर सुरुवात केली. दूरदर्शवरील कार्यक्रमांमध्ये सूत्रसंचालन करत कामाला सुरूवात केली. १९८४ च्या आशियाई गेम्सचं वृत्तांकन केलं. तर १९८२ मध्ये गांधी चित्रपटात महत्वाची भूमिका साकारली. मराठीत मडेली सोपफ चा फार्म्युला रुजवण्याचं श्रेय आपटे यांना जाते.होते.१९७४ साली दूरदर्शनच्या माध्यामातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं आणि त्यानंतर कधीही मागे वळून पाहण्याची वेळ या कलाकारावर आली नाही. चित्रपट असो वा नाटक प्रत्येक ठिकाणी आपला वेगळा ठसा आणि वेगळी ओळख विनय आपटेंनी निर्माण केली. मराठी चित्रपटसृष्टीतील भारदस्त आवाज आणि तेवढ्याच ताकदीचा कलाकार चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीने गमावलाय. त्यांच्या अभिनयाची दखल हिंदी चित्रपटसृष्टीला सुद्धा घ्यावी लागली होती. कुठे खलनायक तर कुठे चरित्र अभिनेता या भूमिका त्यांनी तेवढ्याच ताकदीने साकारल्या आणि जीवंत केल्यात. टेलिव्हिजन, चित्रपट आणि रंगभूमीवरचा चतुरस्त्र आणि वेगळ्या जातकुळीचा अभिनेता ओळखले जाणारे विनय आपटे अनेक मराठी कलाकारांचे गुरु होते.

महेश मांजरेकर, श्रीरंग गोडबोल, सुनील बर्वे, सचिन खेडेकर, सुकन्या कुलकर्णी यांच्यासह अनेक कलाकारांना पारखून त्यांना चित्रपट आणि रंगभूमीवर आणण्याचे श्रेयसुद्धा विनय आपटे यांना जातं.

'एका लग्नाची दुसरी गोष्ट' या गाजलेल्या मालिकेत विनय आपटे यांनी काम केले होते. मराठीसह सत्याग्रह, आरक्षण, धमाल, इट्स ब्रेकिंग न्यूज, चांदनी बार, एक चाळीस की लास्ट लोकल अशा हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले होते. विजय तेंडुलकरांनी लिहलेल्या'मित्राची गोष्ट'यासह असंख्य नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले होते.(साभार : इंटरनेट)

महामार्गाचे काम मार्गी लावा; अधिकाऱ्यांना निर्देश

माणगाव: प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अखेर निर्णायक टप्प्यात पोहोचावे, जनतेला दिलासा मिळावा आणि वर्षानुवर्षे सुरू असलेला त्रास कमी व्हावा, वाहतूक कोंडीतून मुक्तता व्हावी यासाठी रायगड-रत्नागिरीचे कार्यक्षम खासदार सुनील तटकरे यांनी पुन्हा एकदा धडाक्यात पुढाकार घेतला आहे. रोहा तालुक्यातील सुतारवाडी येथील कार्यालयात त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांची तातडीची आढावा बैठक घेतली आणि अकार्यक्षमता, विलंब व वेळकाढूपणा यावर जोरदार झाडाझडती घेतली.

हयगय नाही चालणार काम वेळेत हवे! असा कडक इशारा खासदार सुनील तटकरे यांनी दिला. महामार्गावरील कामांची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेताना अधिकाऱ्यांकडून मिळालेली विलंबाची कारणे आणि वेळकाढू उत्तरे पाहून खासदार तटकरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, कामात हयगय सहन केली जाणार नाही. दिवस-रात्र काम करा. महामार्ग वेळेत पूर्ण झाला पाहिजे. त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे अधिकारी वर्ग सजग झाला असून पुढील काही दिवसांत कामकाजात गती येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. पुल, रस्ते, उड्डाणपूल, बायपास सर्व प्रलंबित कामांना गती देण्याचे आदेश दिले.

महामार्गावरील काही कामे प्रलंबित असल्यामुळे जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अर्धवट पुल, सर्व्हिस रोड उड्डाणपूलांचे अपूर्ण काम, बायपास मार्गांवरील धीम्या हालचाली, मार्गावरील खड्डे आणि निकृष्ट पॅचवर्क, या सर्वांवर खासदारांनी थेट लक्ष केंद्रित करून निर्धारित मुदतीत काम पूर्ण करण्याचे कडक आदेश दिले. प्रवाशांसाठी आधुनिक सुविधांचा आदेश त्यांनी दिले आहेत. ही महामार्ग नसून जीवनवाहिनी आहे मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणवासियांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. हा महामार्ग पूर्ण करताना प्रवाशांना शौचालये, पिण्याचे पाणी, आपत्कालीन मदत केंद्र, पार्किंग व्यवस्था यांसारख्या सोयी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना खासदार सुनील तटकरे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

कर्जत फाटा येथे नित्याचीच वाहतूक कोंडी!

चौक : मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारवर कर्जत फाटा येथे नित्याचीच वाहतूक कोंडी सुरू झाली आहे, अनेक वेळा याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे.

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरून कर्जत,माथेरान, कल्याण कडे जाण्यास मार्ग आहे, याला कर्जत फाटा असेही बोलले जाते. येथे नित्याचीच वाहतूक कोंडी झाली असली तरी शनिवार आणि रविवार या दोन्ही दिवशी तास तास वाहतूक कोंडी होत आहे,येथेच वाहतूक नियंत्रण कक्ष असून तो बंदच असतो, वाहतूक पोलीस तिथे बसल्याचे दिसत नाही.तर वाहतूक पोलिसांच्या दोन खाजगी गाड्या फिरत असताना आढळत आहेत, मात्र वाहतूक कोंडी च्या वेळी त्याही दिसत नाहीत,त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे.

कर्जत इंग्लिश मीडियम स्कूलच्या सुवर्ण महोत्सवाची सांगता

कर्जत : प्रतिनिधी

कर्जत एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूल ला पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सांगता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी स्मरणीकेचे प्रकाशन करण्यात आले.

इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सभागृहात सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. लता तुकाराम सुर्वे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष झुलकरनैन डाभिया, कार्याध्यक्ष डॉ. अनिरुद्ध जोशी, देवीचंद जैन, श्रीकांत मनोरे, प्रवीण गांगल, मदन परमार, पहिल्या मुख्याध्यापिका नेमानी डाभिया, झरीना डाभिया, मुख्याध्यपिका अनुपमा चौधरी, वृषाली वैद्य, मनीषा सुर्वे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला शिक्षिका मानसी पाटील रचित संस्थागीत सादर करण्यात आले. अनिरुध्द जोशी यांनी स्वागत केले व प्रास्ताविकात संस्थेच्या वाटचालीचाआढावा सादर केला. त्यानंतर स्मरणीकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच पहिल्या पासून दिलेल्या देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. श्रीकांत मनोरे यांनी, ' या शाळेची जागा तत्कालीन सरपंच माजी आमदार तुकाराम सुर्वे यांनी मिळवून दिली. त्यानंतर तत्कालीन सरपंच अनंत जोशी यांनी हि जागा ९९ वर्षांच्या कराराने संस्थेला दिली. त्यामुळेच या शाळा येथे सुरु झाली व इंग्रजी माध्यमाची पहिली शाळा म्हणून नावारूपाला आली.' असे स्पष्ट केले. पहिल्या शिक्षिका झरीना डाभीया यांनी, 'माझ्या डोळ्यात आज आंनदाश्रू आले आहेत. विस विद्यार्थी अगदी निरुत्साही होते. मात्र आता तिसरी पिढी शिकत आहे. याचा आनंद आहे.' असे सांगितले.

याप्रसंगी मोहन ओसवाल, मोहन पाटील, घेवरचंद ओसवाल, श्रीनिवास कुंटे, विक्रम वैद्य, दिनेश जैन, मंगल परमार, रोहित ओसवाल, विवेक पेठे, सचिन मनोरे, प्रवीण भलगट, सतीश पिंपरे, शेखर शहासने, कोरस राठोड, संजेश जैन, कुणाल पाटील, हर्षद दगडे आदी उपस्थित होते.

तळा ज्युनियर कॉलेजमध्ये पालकभा; विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर

तळा : प्रतिनिधी

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, तळा येथे आयोजित शिक्षक-पालक सहविचार सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे नियोजन, बोर्ड परीक्षेची तयारी तसेच शैक्षणिक शिस्त आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप ढाकणे होते. यावेळी प्रा. पाटील एन. सी., प्रा. कसबे पी. पी., प्रा. शिंदे बी. डी., प्रा. वाडीकर के. जे., प्रा. भुरे टी. एन., प्रा. द्याणेकर बी. एन., प्रा. सर्जे व्ही. बी., प्रा. जमादार एस. टी., प्रा. गायकवाड पी. एम., प्रा. बोळेगावे आय. बी., प्रा. आंबेगावे डी. टी. तसेच इतर सर्व शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रथम सत्र परीक्षेचा निकाल जाहीर करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पालकांसमोर मांडण्यात आली. मोबाईलचा योग्य वापर, महाविद्यालयात वेळेवर उपस्थिती, नियमित ड्रेसकोड, शालेय-सहशालेय उपक्रमांमध्ये सहभाग, विद्यार्थ्यांचे आरोग्य, वेळेवर भोजन, शिस्त, अभ्यास यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवरही पालकांशी संवाद साधण्यात आला. बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एस. टी. सुविधा, तसेच पालक-शिक्षक संपर्क वाढविण्यावर भर देण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांच्या जीवनात पालकांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे असल्याचे सांगितले. पालकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सतत सहकार्य केल्यास त्यांचा यशाचा आलेख निश्चितच उंचावतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. दरम्यान तसेच वर्गशिक्षक व शिक्षकांनी थेट पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्राचार्य ढाकणे यांनी संस्थेचे पदाधिकारी व शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

पोलादपुरात चांद्रयान-३ ठरले विज्ञान प्रदर्शनाचे आकर्षण

पोलादपूर : प्रतिनिधी

तालुका विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन नरवीर तानाजी विद्यालय देवळे येथे करण्यात आले असता मुदतपुर्ण झालेल्या माजी जि.प. व पं.स. सदस्यांची राजकीय भाषणे शाळकरी विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी ठरली.

यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, पोलादपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती शैलेश सलागरे, शाळा समिती अध्यक्ष ज्ञानदेव केसरकर, माजी सरपंच व भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, गणित विज्ञान मंडळाचे अध्यक्ष सुरेश साबळे, मारुती कळंबे, विजय पवार, ज्ञानोबा रेणोसे ,विक्रम केसरकर, शिवाजी केसरकर, आनंद केसरकर, विनायक केसरकर, धर्मेंद्र रिंगे मुख्याध्यापक राकेश पिंगळा, किसन सुरवसे, नवाज तांबोळी, टी डी जाधव, सुनील शिंदे, शिक्षकेतर संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष विद्याधर कोळसकर आदींसह बहुसंख्येने शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व बाल वैज्ञानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील सर्व शाळेतून सुमारे ४० प्रतिकृती प्रदर्शनात मांडण्यात आल्या. देवळे विद्यालयाचे विज्ञान शिक्षक सुखलाल बागुल यांनी तयार केलेली प्रतिकृती चांद्रयान ३ ही प्रतिकृती विशेष आकर्षण ठरली.

विज्ञान प्रदर्शनातून एखादा विद्यार्थी मिसाईल मॅन अब्दुल एपीजे अब्दुल कलाम निर्माण होऊ शकतात असे मत कळंबे यांनी व्यक्त केले.

अलिबाग : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. सोबत माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व अन्य.

निजामपुरात भूसंपादन व जमिनीविषयक कायदेशीर मार्गदर्शन

माणगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील निजामपूर ग्रामपंचायत कार्यालय येथील सभागृहात सोमवार दि.८ डिसेंबर २०२५ सकाळी ११ वाजता डीएमआयसी भूसंपादन व जमिनी विषयक मोफत कायदेशीर मार्गदर्शनपार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सर्वहारा जनआंदोलनाच्या संस्थापक उल्काताई महाजन व अँड.गौरी घळसासी हे मान्यवर उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तरी या शिबिरास शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक जनार्दन मानकर यांनी केले आहे.

आपल्या विभागातील भिरा पाटणूस म्हसेवाडी, लव्हेलीवाडी, साजे, साजे आदिवासी वाडी, रवाळजे, नारायणगाव, बहिरीचीवाडी, विळा,बेडगाव येथील जमीन टाटा भिरा अवजल विद्युत प्रकल्पासाठी संपादित झाली. विळा,वरची वाडी, सणसवाडी,तासगाव,तासगाव आदिवासीवाडी,भागाड,येलावडे गावची सुमारे १५०० हेक्टर जमीन कवडीमोल दरात विळे भागाड एमआयडीसी साठी संपादित झाली...तिथे आलेले कारखाने, कारखान्यात आपल्या माणसाना मिळालेले कंत्राट आणि आपल्या मुलाबाळांना लागलेल्या नोकऱ्या आपण पाहतच आहात

हजारो हेक्टर जमीन दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर साठी भूसंपादित झाली. आपल्या स्वतःचे घर बांधण्यासाठी शेकडो परवानग्या घ्याव्या लागतात.आगामी काळात निजामपूर विभागांतील प्रत्येक तरूणांच्या वाट्याला सुखा पेक्षा दुःखाचेच दिवस जास्त असणार आहेत. म्हणून जागे व्हा सुशिक्षीत व्हा,संघटित होऊन.. संघर्ष करा जमीन वाचविण्याच्या लढाईत सामील व्हा निजामपूर ग्रामपंचायत सभागृहात आयोजित मोफत कायदेशीर मार्गदर्शन शिबिरास हजर रहा असे आवाहन केले

दहिवलीत जागतिक दिव्यांग दिन साजरा

कर्जत : प्रतिनिधी

श्री समर्थ कृपा सेवाभावी सामाजिक संस्था (छत्रपती शिवाजी महाराज नगर, दहिवली) संचालित द्वारकाई विशेष मुलांची शाळा यांच्या वतीने 'जागतिक दिव्यांग दिवस' निमित्त विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी विविध मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी दहिवली विचार मंचला विशेष आमंत्रण देण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुनिल जाधव, मार्गदर्शक विकास चित्ते, मनीषा ढुमणे, मल्हारी माने, जयप्रकाश जाधव उपस्थित होते.

या शाळेतील विशेष मुलांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संचालक सागर पवार आणि त्यांची उत्कृष्ट टीम अत्यंत मनापासून कार्यरत आहे. मुलांना इतरांवर अवलंबून न राहता स्वावलंबी बनवणे, दैनंदिन कृती स्वतः करण्याचे कौशल्य विकसित करणे. ही त्यांची ध्येयधोरणे आहेत.

बौद्धिक विकासासोबतच शारीरिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन या मुलांना विविध उपक्रमांद्वारे प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे ही मुले सर्वसामान्य मुलांप्रमाणे आत्मविश्वासाने वागू शकतील, समाजात आपले स्थान निर्माण करू शकतील. यासाठी ही टीम अखंड प्रयत्नशील आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे शिरढोण, तहसील- पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

शेतजमीनीचे वर्णन

मौजे शिरढोण, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

गट क्रमांक व उपविभाग	भोगवटादार वर्ग	क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती	क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती	क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती	आकार रू.पै.
१३३/५/ब	२	०-२४-००	०-२०-००	०-४४-००	४.१९

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/१२/२०२५

सही/-
अॅड. स्वप्निल व्यं. जाधव
बी.ए., एल. एल. बी.

कार्यालयीन पत्ता - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that the original Allotment Letter pertaining to the property, **ROOM NO - 12, PRATIK CHS, PLOT NO -B/48, SECTOR - 12, KHARGHAR - 410210,** issued in the name of **UMAKANT BHAGWAN PATIL,** has been misplaced / lost and is no longer traceable despite diligent search.

The said Allotment Letter is not mortgaged, pledged, or deposited with any person, bank, financial institution, or authority. No one has any right, title, interest, claim, or objection whatsoever in respect of the said Allotment Letter or the above-mentioned property.

Any person claiming to have found the said document or having any objection or claim in respect thereof is hereby required to contact me at the address mentioned above within 15 (fifteen) days from the date of publication of this notice. If no claim or objection is received within the stipulated period, it shall be presumed that no such claim exists, and my client shall be free to apply for issuance of a duplicate Allotment Letter or take such steps as may be necessary.

For and on behalf of:

sd/-
Adv. Aditya R Katakdound
Kharghar cha Raja Ganesh Temple (Basement), Sectoor 12, Kharghar, Navi Mumbai 410210

Date: 07/12/2025

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE ADDITIONAL COLLECTOR, AT ALIBAUG
INTERIM APPLICATION...OF 2025 IN RTS APPEAL NO....OF 2025. IN RTS NO. 579 OF 2025.

Mr. Sadanand Madhav Joshi & Ors. ..... Appellants
Vs.
Mr. Kalya Chango Gaikar & Ors. ..... Respondents

That my clients i.e. Appellants are the legal heirs of Late Mr. Waman Ganesh Pandit, namely **Mr. Sadananda Madhav Joshi, Mr. Makrand Madhav Joshi, Mrs. Kshama Madhav Joshi, Kedar Balwant Hasbnis and Mr. Mandar Balwant Hasbnis,** have filed interim Application in Appeal Nos. 518 of 2025. 519 of 2025 and 520 of 2025, for not to create third party rights, before Additional Collector, at Alibaug, as the scheduled property owned by Appellants Grandfather i.e. Late. Shri. Waman Ganesh Pandit, and he has given the same to the late. Chngo Ragho Gaikar, to survive himself and his family but after his sad demise, Respondents No. 01 and 02, i.e.. Kamlya Chango Gaikar and Mr. Jaydas Kamlya Gaikar, after making 32G and 32M proceedings, transfers the same on their names without knowledge of neither Late. Mr. Waman Ganesh Pundit nor the Appellants i.e. his Legal heirs.

That the Appellant making appeal before the public at large not to purchase the scheduled property from the Kamlya Chango Gaikar and Mr. Jaydas Kamlya Gaikar, till the passing of the orders, which are pending before the Hon'ble Forum i.e. Additional Collector at Alibaug.

SCHEDULE OF THE PROPERTY

All that the property i.e. property at **Girvale Village, bearing survey No. 39 (1) (b), admeasuring 0.44.50 R. Sq. Mtr.**
All that the property i.e. property at **Girvale Village, bearing survey No. 39 (3).admeasuring 0.10.10 R. Sq. Mtr.**
All that the property ie, property at **Girvale Village, bearing survey No. 94 (2). admeasuring 0.69.80 R. Sq. Mtr.**

Dated this 06th December 2025.

sd/-
Adv. Priyanka N. Patil.
Advocate for Petitioners.
Office Address: Shraddha Sneh Apt, B-101, opp. To Jakat Naka, Panvel-Uran Road, Koliwada, Panvel- 410206.
Email: aswalepriyanka30@gmail.com
Contact No.9867042996/9619965851.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that the original Allotment Letter pertaining to the property, **ROOM NO-11, PRATIK CHS, PLOT NO - B/48, SECTOR - 12, KHARGHAR - 410210,** issued in the name of **YOGITA BHAGWAN PATIL AND RISHIKESH BHAGWAN PATIL,** has been misplaced/lost and is no longer traceable despite diligent search.

The said Allotment Letter is not mortgaged, pledged, or deposited with any person, bank, financial institution, or authority. No one has any right, title, interest, claim, or objection whatsoever in respect of the said Allotment Letter or the above-mentioned property.

Any person claiming to have found the said document or having any objection or claim in respect thereof is hereby required to contact me at the address mentioned above within 15 (fifteen) days from the date of publication of this notice. If no claim or objection is received within the stipulated period, it shall be presumed that no such claim exists, and my client shall be free to apply for issuance of a duplicate Allotment Letter or take such steps as may be necessary.

For and on behalf of:

Date: 07/12/2025

sd/-
Adv. Aditya R Katakdound
Kharghar cha Raja Ganesh Temple (Basement), Sectoor 12, Kharghar, Navi Mumbai 410210

जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, सिडको लि. यांनी २२.५ टक्के योजनेनुसार संपादीत मिळकतीपोटी वितरीत केलेला खालील वर्णनाचा भूखंड मे. प्रसाद कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री. अनिल ठक्करशी ठक्कर व श्री. भागचंद चुवडमल खुबचंदानी यांच्या नावे हस्तांतरीत झालेला आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे-पुष्पक नोड (वडघर), ता. पनवेल, जि. रायगड.

भूखंड नं.	सेक्टर नं.	क्षेत्र
७८	१	१८० चौ.मी.

आमचे अशिल वर नमूद भूखंड **मे. प्रसाद कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार १) श्री. अनिल ठक्करशी ठक्कर, २) श्री. भागचंद चुवडमल खुबचंदानी** यांच्याकडून त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या विचारात आहे. तरी सदर मिळकतीवर/भुखंडावर वा त्याच्या कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दि.०६/१२/२०२५.

सही/-
अॅड. प्रशांत अ. भुजबळ.

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेलता. पनवेल, जि. रायगड

खोपोली भाजप उमेदवारांनी घेतली आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट

ध्येय, धोरण संघटनात्मक मार्गदर्शनासह पक्षप्रवेश

पनवेल : रामप्रहर वृत्त

खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५च्या माध्यमातून भारतीय जनता महायुतीच्या सर्व उमेदवारांनी भाजप निवडणूक निरीक्षक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या माध्यमातून निवडणुकीअंती पक्ष संघटना सक्षम व मजबूत करण्याचा निर्धार करीत आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची सदिच्छा भेट घेतली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी खोपोली नगर परिषद निवडणुकीच्या महायुतीतील लढतीबाबत विविध विषयांवर चर्चा करुन त्यांचे मनोबल वाढवले. भाजपच्या सर्व उमेदवारांचे व त्यांना निरीक्षक म्हणून नियोजनबद्ध मार्गदर्शन करणारे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ॲड. प्रकाश बिनेदार, सुनील घरत व सय्यद अकबर आणि सर्व

सहकारी वर्गाचे विशेष कौतुक केले.

यावेळी आपण सर्वांनी ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आदर्श समोर ठेवून महिन्यातून एकदा तरी पक्षाच्या माध्यमातून जनसंवाद,चर्चा व्हावी व संघटनात्मक वैचारिक बळ मिळावे या उद्देशाने 'मन की बात'सारखे कार्यक्रम घ्यावे, जनेतच्या मनात भाजप पक्षाच्या सकारात्मक विचारांना पोहचविण्याचा प्रयत्न करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. आपण सर्वांनी या पुढे शहराच्या विविध प्रभागातील उपक्रमांत पक्षाच्या सर्व कार्यक्रमात सहभागी होत सक्षम संघटना उभारावी, असे सांगत पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी मार्गदर्शन करताना शहर व जिल्हा कार्यकारिणीमध्ये आपल्या माध्यमातून वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडायचे असल्याचे सांगत पार पडलेल्या निवडणुकीत यशस्वी नियोजना सारखेच भाजप पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करूया असे सांगितले.

खोपोली भाजप महायुतीच्या सर्व उमेदवारांनी भाजप निवडणूक निरीक्षक ॲड. प्रकाश बिनेदार व सर्व सहकाऱ्यांची विशेष कौतुक करीत पक्ष संघटनेच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होत शहरात अनेकांचे पक्षप्रवेश होणार असल्याचे सांगत प्रभाग ०५मधून अभिषेक कासार व प्रभाग ११मधून अमान शेख यांच्यासह शहरातील विविध कार्यकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते पक्षप्रवेश केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी शाल पुष्पगुच्छ देऊन त्यांचे विशेष आभार मानले.

या वेळी सर्वांनी पनवेल भाजप कार्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने पुष्प अर्पण करून घोषणा देत अभिवादन केले.

यावेळी भाजप अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, भाजप खोपोली शहराध्यक्ष अजय इंगुळकर, शहरातील ज्येष्ठ नेते इंदरमलशेठ खंडेलवाल, जिल्हा सदस्य रसिका शेट्ये, माजी नगरसेवक रमेश रेटरेकर, महिला शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, जिल्हा सदस्य स्नेहल सावंत, भाजप शहर मंडळाचे संजय म्हात्रे, अपर्णा साठे, नामदेव मोरे, संदेश पाटील, निलेश दळवी तसेच भाजप महायुतीतून उमेदवारी लढविणारे पदाधिकारी, विक्रम साबळे, सोनिया रुपवते, सानिया शेख, किशोर पाटील, संजय तन्ना, प्रतीक्षा रेटरेकर, सुजाता मोरे व इतर अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल पोलिसांनी चोरट्याला गुजरातमधून घेतले ताब्यात

पनवेल : वार्ताहर

पनवेल शहरातील हॉलमार्क मोटर लिंकस् येथून १ लाख ८१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून पळून गेलेल्या दुकलीपैकी एकाला पनवेल शहर पोलिसांनी गुजरातमधून ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहरातील पनवेल इंडस्ट्रीयल को.ऑ. इस्टेट लिमीटेड मधील हॉलमार्क मोटर लिंकस् एल.एल.पी., (रॉयल इनफील्ड) येथून लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, दोन मोबाईल फोन व १ लाख ७० हजार रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांकडे गुन्हा दाखल झाला होता.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण, पोहवा कुडावकर, पोना प्रविण मेथे व पोशि शशीकांत काकडे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेतला असता आरोपी मुरली उर्फ अलेक्स पवार (रा. वलसाड, गुजरात) याला गुजरात येथून ताब्यात घेतले .त्याने त्याचा साथीदार दिनेश माहिते (रा. वलसाड, गुजरात) याच्या साथीने चोरी केल्याची माहिती दिली. त्याच्याकडून पोलिसांनी ५० हजार रुपये जप्त केले असून त्याचा दुसरा साथीदार दिनेश माहिते याचा शोध पोलीस घेत आहेत.

पनवेल : भाजप नवीन पनवेल मंडळ जनसंपर्क कार्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी शांताराम महाडिक, संजय कांबळे, गोपीनाथ मुंडे, अंकुश खरमाटे, भद्रशेट्टी, युवराज बेडसे, पुंडलिक म्हात्रे, अमोल घायाळ उपस्थित होते.

दिवाळेत ज्येष्ठ नागरिक संस्थेचे दंत तपासणी शिबिर

नवी मुंबई : बातमीदार

आहाराच्या सवयी, जीवनशैली अशा विविध गोष्टींचा परिणाम इतर अवयवांप्रमाणे दातांवरही होताना दिसतो. यामुळे, नागरिकांमध्ये दातांच्या अनेक समस्या निर्माण होत असतात. विशेष म्हणजे ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड वेदना सहन कराव्या लागतात. या अनुषंगाने योग्य उपचार व्हावेत यासाठी बेलापूर येथील भारती विद्यापीठ दंत रुग्णालय यांच्या वतीने बुधवार (दि.३) मोफत दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी, पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घेतला.

या शिबिरात अनुभवी दंतोपचार तज्ज्ञांकडून तपासणी व मार्गदर्शन करून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार दात साफ करणे, रूट कॅनल, कृत्रिम दात बसविणे, कॅव्हिटीवरील उपचार, कवळी बसविणे, वेडेवाकडे दात सरळ करणे या संदर्भात विशेष मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी, भारतीविद्यापीठ दंत रुग्णालयाचे डॉक्टर, संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

उलवे मराठी माध्यम विद्यालयात महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या सौ शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे मराठी माध्यम विद्यालयात महापरिनिर्वाण दिन संपन्न झाला यावेळी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील विविध विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवन चरित्र बद्दल अनेक प्रसंग शब्दात वर्णन केले तसेच विद्यालयातील शिक्षक बंधू भगिनींनी महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद केले शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके यांनी बाबासाहेबांचे जीवनपट अनेक घटनांतून आणि प्रसंगातून अत्यंत समर्पक शब्दामध्ये विशद केले

विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ भारती म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी सीएम पाटील, वेदांनी म्हात्रे , धनाजी पाटील, जाऊ घरत शिपाई यांची मोलाचे सहकार्य लाभले शेवटी कार्यक्रम अध्यक्षांच्या परवानगीने संपली जाहीर केले.

आयपीएसच्या ५३व्या परिषदेचे वाशीत उद्घाटन

नवी मुंबई : बातमीदार

आयपीएसच्या ५३ व्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन वाशी येथील सिडको कन्व्हेन्शन सेंटर येथे झाले शुक्रवारी झाले. यात देशभरातून २,६०० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला असून ७ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या चार दिवसांच्या वैज्ञानिक परिषदेत मोठ्या संख्येने व्यापारी भागीदार देखील सहभागी झाले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

इंडियन प्रोस्थोडोंटिक्स सोसायटीत अर्थात आय पी एस संस्था प्रोस्थोडोंटिक्स क्षेत्रातील सर्वात मोठ्या संमेलनांपैकी एक आहे.प्रस्थोडोंटिक्सची खासियत म्हणजे तोंडी आणि मॅक्सिलोफेशियल प्रोस्थेसिस

तसेच दंत रोपणांवर ही लक्ष केंद्रित करते.

उद्घाटनाच्या दिवशी ५३ प्री-कॉन्फरन्स अभ्यासक्रम आयोजित करण्यात आले. पुढील तीन दिवसांत अत्याधुनिक ठिकाणी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वक्त्यांची व्याख्याने होतील अशी माहिती डॉ परमित बंगा यांनी दिली. यावेळी प्रसिद्ध हेड अँड नेक ऑन्को-सर्जन, डॉ. पंकज चतुर्वेदी, अध्यक्ष डॉ. गौरांग मिस्त्री, सचिव डॉ. परमीत बंगा, सरचिटणीस डॉ. जंगला हरी आणि इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.परिषद दरम्यान ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. सुरेश मेश्राम (जीवनगौरव पुरस्कार) आणि प्रा. डॉ. रामानंद शेट्टी (द्रोणाचार्य पुरस्कार) आदिना सन्मानित केले जाईल.

जागतिक दिव्यांग दिनी जनजागृती रॅली

नवी मुंबई : बातमीदार

महानगरपालिका इटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राद्वारे दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून आज ०३ डिसेंबर म्हणजेच जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून विशेष जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच संपूर्ण डिसेंबर महिन्यामध्ये विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. समाजामध्ये दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणे तसेच दिव्यांग मुलांना प्रोत्साहित करणे या हेतूने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

०२ डिसेंबर रोजी इटीसी केंद्रातील दिव्यांग मुलांच्या

पालकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत डॉ.अमृता जोशी आणि श्री.सागर पगार यांनी पालकांना सुजाण पालकत्व या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले.

संपूर्ण डिसेंबर महिन्यामध्ये होणा-या विविध उपक्रमांपैकी एक महत्वाचा उपक्रम म्हणजे आज ३ डिसेंबर रोजी दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणेकरिता आयोजित करण्यात येत आलेली रॅली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिव्यांगत्वाविषयी जनजागृतीकरिता विशेष रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नमुंमपा इटीसी केंद्रातील कर्मचारी, केंद्रामधील विविध प्रवर्गातील दिव्यांग मुले व त्यांचे पालक तसेच निर्भया फाऊंडेशनचे संस्थापक मनोज बर्डे व त्यांचे सहकारी उपस्थितहोते.

या रॅलीचा प्रारंभ इटीसी केंद्रामधून करण्यात आला. इटीसी केंद्र ते वाशी स्टेशन परिसर येथे रॅली आली असता मानवी साखळी करून दिव्यांगत्वाबाबत माहिती दर्शविणारे फलक व घोषणा याद्वारे दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना इटीसी केंद्राच्या संचालिका डॉ. अनुराधा बाबर यांनी ३ डिसेंबर हा दिव्यांगत्व जनजागृतीसाठी महत्त्वाचा दिवस असल्याचे सांगितले. समाजातील सर्व स्तरांवर दिव्यांगांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

या रॅलीची सांगता पुन्हा इटीसी केंद्रामध्ये येऊन करण्यात आली. रॅलीनंतर दिव्यांग मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. या रॅलीमध्ये एकूण ४४० दिव्यांग मुले त्यांच्या पालकांसह उपस्थित होती. या रॅलीसाठी केंद्राच्या संचालिका डॉ.अनुराधा बाबर यांनी स्वतः उपस्थित राहून सर्व दिव्यांग मुले व पालक यांचा उत्साह वाढविला.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करीत यासाठी विविध उपक्रम राबवण्याकरिता नवी मुंबई महापालिका नेहमीच प्रयत्नशील आहे असे मत व्यक्त केले. अतिरिक्त आयुक्त श्री सुनील पवार यांनीही दिव्यांगत्वामुळे खचून न जाता शिक्षण, प्रशिक्षण घेऊन समाजाचा एक महत्त्वाचा घटक बनण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. या रॅलीचे आयोजन इटीसी केंद्र संचालिका डॉ. अनुराधा बाबर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. रॅलीचे नियोजन तसेच नियंत्रण व देखरेख इटीसी केंद्राच्याअधीक्षक व कर्णबधिरविभाग, मतिमंद विभाग यांचे शैक्षणिक व्यवस्थापक यांनी केले.

दि बुद्धिस्ट सोशल फोरमकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

नवी मुंबई : प्रतिनिधी

दि बुद्धिस्ट सोशल फॉरमच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नेरुळ सेक्टर ८ येथील एल मार्केट मध्ये आयोजित कार्यक्रमात शिवसेना माजी नगरसेवक रतन मांडवे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)बेलापूर विधानसभा,

सरचिटणीस, मारुतीराव चौधरी, वंचित बहुजन आघाडी, उपाध्यक्ष दिलीप गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक रतन मांडवे यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रक्ताचा एक थेंब ही न सांडता आदर्श राज्यघटना भारतीयांना दिली असून या महामानवाचे आपल्यावर फार मोठे उपकार आहेत. लोकशाहीत गरीब-श्रीमंत न पाहता प्रत्येकाला एकच मत देण्याचा हक्क देऊन समता, स्वातंत्र्य, बंधूता आणि न्याय व्यवस्था बळकट केल्याचे रतन मांडवे यांनी सांगितले. यावेळी

सर्वश्री आनंदराव पाटील, तुकाराम भोसले सुरेश मोरे, गौतम शिरवाळे, बाळू मोढवे, राजाराम घाडगे, राजू जाधव यासह डॉ. आंबेडकर अनुयायी उपस्थितीत होते.

गीता जयंतीच्या निमित्ताने भगवद्गीता श्लोकांचे पठण

नवी मुंबई : बातमीदार

विश्व हिंदू परिषद अंतर्गत बजरंग दल नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने गीता जयंतीच्या निमित्ताने नुकतेच नवी मुंबईतील विविध ठिकाणी गीता जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

यामध्ये भगवद्गीता श्लोकांचे पठण तसेच व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबईतील रबाळे सानपाडा, वाशी, बेलापूर, उलवे, तुर्भे या प्रखंडांमध्ये भगवद्गीता जयंतीचे उत्सव नागरिकांच्या उपस्थितीत पार पडले. वाशी येथे झालेल्या उत्सवात बजरंग दल कोकण प्रांत महाविद्यालयीन प्रमुख सर्वेश तिवारी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी गीता जयंती व शौर्य दिवस यासंदर्भात संबोधन केले.

१४ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबईत होणाऱ्या बजरंग दल नवी मुंबई जिल्हा व कळवा मुंब्रा जिल्ह्याच्या एकत्रित भव्य शौर्य संचलनाची सविस्तर माहिती बजरंग दल नवी मुंबई जिल्हा संयोजक शंकर संगपाळ यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिली. तसेच जास्तीत जास्त संख्येने शौर्य संचलनात सहभागी होण्याबाबत तरुणांना आवाहन केले. या कार्यक्रमात देवनाथ कृष्णा म्हात्रे यांनी नेरूळ येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाबाबत केलेल्या यशस्वी पाठपुराव्याबद्दल विश्व हिंदू परिषद अंतर्गत बजरंग दलाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास बजरंग दल ठाणे विभाग संयोजक अमरजीत सुर्वे, विश्व हिंदू परिषद नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष अशोकजी भनसाली, जिल्हा मंत्री स्वरूप जी पाटील, जिल्हा सहमंत्री शाम जी मोहनन, विशेष संपर्कप्रमुख मुकेश जी गांधी, बजरंग दल जिल्हा सहसंयोजक अरुण पाटील, तेजस पाटील, जिल्हा सुरक्षा प्रमुख संजीवजी रावत व कार्यकर्ते उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय परिषदेत नवी मुंबई महापालिकेचे मॅनहोल टू मशीनहोल विषयावर प्रभावी सादरीकरण

नवी मुंबई : बातमीदार

'वर्ल्ड टॉयलेट समिट २०२५' या जागतिक स्तरावरील परिषदेत नवी मुंबई महानगरपालिकेस 'मॅनहोल टू मशीनहोल' या यशस्वी अंमलबजावणी झालेल्या उपक्रमाच्या सादरीकरणासाठी निमंत्रित करण्यात आले होते. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नवी मुंबई महानगरपालिकेस आपले उल्लेखनीय उपक्रम मांडण्याची संधी मिळणे हा महानगरपालिकेचा जागतिक स्तरावर झालेला गौरव आहे.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मान्यतेने व अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, नमुंमपा उपअभियंता स्वप्नील देसाई यांनी 'मॅनहोल टू मशीनहोल-ऑपरेशन्समधील कार्यक्षमता' या विषयावर नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व करुन प्रभावी सादरीकरण केले. या माहितीपूर्ण सादरीकरणाची विविध देशातील उपस्थित प्रतिनिधींनी प्रशंसा केली.

तसेच अनेक देशाच्या प्रतिनिधींनी या मॉडेलचा अभ्यास करुन ही कार्यप्रणाली अंगीकारण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. वर्ल्ड टॉयलेट ऑर्गनायझेशनचे संस्थापक जॅक सीम यांच्या हस्ते नवी मुंबई महानगरपालिकेचा सन्मान करण्यात आला. या परिषदेस भूतान, कॅनडा, कतार, द.आफ्रिका, सिंगापूर, थायलंड, बांग्लादेश, स्वीडन व इतर देशांतील तसेच भारतातील विविध मोठ्या शहरांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वच्छतेच्या विविध क्षेत्रातील आव्हाने व संधी आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानावर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे होत असलेले फायदे तसेच भविष्यातील शाश्वत स्वच्छता प्रणालींचा अभ्यास करण्यासाठी वर्ल्ड टॉयलेट ऑर्गनायझेशन कार्यरत आहे. त्यांचेमार्फत प्रत्येक वर्षी जागतिक स्तरावर या परिषदेचे आयोजन करुन आरोग्य, पर्यावरण संरक्षण, सांडपाणी व्यवस्थापन, सुरक्षित स्वच्छता प्रणाली अशा महत्वपूर्ण विषयांवर चर्चा घडवून आणली जाते आणि माहिती व विचारांचे आदानप्रदान घडवून आणले जाते.

दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या शिखर परिषदेच्या मंचावरुन जगभरातील विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ, संशोधक, शासकीय पदाधिकारी व अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रमुख एकत्र येऊन विचारांचे आदान प्रदान करतात. अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःस्सारण व्यवस्थापनातील स्वच्छता प्रणालीची माहिती देण्यासाठी महानगरपालिकेस आमंत्रित केले जाणे हा महानगरपालिकेचा जागतिक पातळीवर झालेला गौरव आहे.

सलग वादळांचा मच्छीमारांना फटका

श्रीवर्धन : प्रतिनिधी

समुद्र शांत असताना उपजीविका देतो, पण रौद्रावतार धारण केला की हजारो घरांची चूल विझवतो. रायगड जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांवर अशीच परिस्थिती ओढवली आहे. सलग वादळांच्या तडाख्यामुळे संपूर्ण हंगाम पाच महिने उलटूनही सुरूच होऊ शकलेला नाही.

मेपासून सुरू झालेली वादळांची मालिका 'निसर्ग'नंतर 'गुलाब', त्यानंतर 'शक्ती' अशा प्रत्येक वादळाने किनारी पोटापाण्यावर जगणारे भरटखोल, श्रीवर्धन, बागमंडला, मेंदडी, दिघी, जीवना बंदर, मुळगाव, वाशी, दिवेआगर, शेखाडी, कुडगाव येथील मच्छीमार अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहेत.

वादळे, अस्थिर हवामान, उंच लाटा समुद्रात उतरणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण. त्यामुळे किनाऱ्यावर शेकडो बोटी नांगरलेल्या आहेत. मच्छीमार बांधवांकडून तातडीच्या मागण्या पुढे सरसावल्या आहेत. यामध्ये डिझेल सवलत तत्काळ लागू करावी, जाळी व बोट दुरुस्ती अनुदान वाढवावे, थकलेली कर्जे माफ करावी, आपत्ती निवारक निधीतून थेट आर्थिक मदत, बंद हंगामातील जीवनावश्यक भत्ता पुन्हा सुरू करावा, कोकण मत्स्यव्यवसाय आपत्ती पॅकेज जाहीर करणे अपरिहार्य झाले आहे.

मच्छीमारांना कृषीसारखेच सवलतीचे दर मिळाले पाहिजेत. कर्जमाफी, डिझेल-साहित्य सवलत, आणि फिशरिज विद्यापीठाचे केंद्र श्रीवर्धनमध्ये ही आमची ठाम मागणी आहे, असे सागर शक्तीचे अध्यक्ष हरिदास वाघे यांनी सांगितले. कोकण मच्छीमार संस्थेचे चेअरमन इम्तियाज कोकाटे यांनी, मत्स्यव्यवसाय हा कृषीइतकाच महत्त्वाचा स्तंभ आहे. म्हणून डिझेल सवलत, कर्जमाफी, बोट-जाळी अनुदान वाढ आणि बंद हंगामातील भत्ता देण्यावर भर दिला, तर श्रीकृष्ण मच्छीमार संस्थेचे चेअरमन भारत चोगले यांनी म्हटले की, पाच महिने हंगाम बंद राहणे म्हणजे मच्छीमारांच्या घरात उपाशीपोटाची रडारड आहे. डिझेल, बर्फ, अन्नदर वाढले; कर्जाचे ताण असह्य झाले. महिला विक्रे त्या रोजंदारीशिवाय कोसळत आहेत. शासनाने कोकणासाठी तातडीने विशेष पॅकेज मंजूर करावे हीच मच्छिमारांची आर्त विनंती आहे.

रोहा-कोलाडदरम्यान दुचाकींच्या अपघातात दोन ठार, दोघे जखमी

नागोठणे, धाटाव : बातमीदार

रोहा-कोलाड रस्त्यावर संभे गावाच्या हद्दीत शुक्रवारी (दि. ५) रात्री साडेनऊच्या सुमारास होंडा शाइन मोटरसायकल (एमएच ०६ बीजे ३३१८) आणि स्कुटी (एमएच ०६ सीबी ३७०१) ही वाहने एकमेकांवर धडकली. या अपघातामध्ये दोन्ही दुचाकीचालकांचा मृत्यू झाला असून स्कुटीवर पाठीमागे बसलेले दोन जण जखमी झाले आहेत.

दिनेश भिकू पवार (वय ३४, विठ्ठलनगर, रातवड, ता. माणगाव) हे त्यांच्या ताब्यातील होंडा शाइन मोटरसायकलवरून धाटावकडे जात असताना समोरून आलेल्या जावीर इब्राहीम शाह (वय २८, धाटाव, ता. रोहा, मूळ कुशीनगर, उत्तर प्रदेश) यांच्या स्कूटरला जोराची धडक लागली. या अपघातात चालकांसह अशपाक मोहम्मद फारुख अली (रा. वार्ड नं १०, शक्तीनगर, कुशीनगर) व मोहन पवहारी सिंग (रा. सिधावे टोला, रामटोकोला, कुशीनगर) यांना लहान-मोठ्या दुखापती झाल्या.

जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्र कोलाड येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासून दोन्ही चालक दिनेश पवार आणि जावीर शाह मयत झालेले असल्याचे सांगितले, तर इतर जखमींना अधिक उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय रोहा येथे दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघाताची नोंद कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

धाटाव एमआयडीसीत अधिकारी, कामगारांना मार्गदर्शन

धाटाव : प्रतिनिधी

धाटाव (रोहा) येथील आरआयए सभागृहात इंडियन केमिकल कौन्सिल आयोजित दोन दिवसीय मार्गदर्शन शिबिर झाले. या शिबिरात एमआयडीसीतील अधिकारी, कुशल कामगारांना सुरक्षा व पर्यावरणबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

शुभारंभ कार्यक्रमास व्यासपीठावर इंडियन केमिकल्स कौन्सिलचे प्रदीप चाटू, सुरेश रामचंद्रन, आर. कडीवाल, निलेश पाटील, कुमार श्रीवास्तव, सोथी सेल्वम, सतीश सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उद्योजक तथा आरआयएचे अध्यक्ष पी.पी. बारदेशकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी कारखान्यांमध्ये काही त्रुटी असतील तर जबाबदारी केवळ उद्योगांवर टाकणे अन्यायाकारक आहे, असे मत व्यक्त केले. त्याचबरोबर सुरक्षा ही सामूहिक जबाबदारी आहे. याबाबत इंडियन केमिकल कौन्सिलने अधिक जनजागृती करणे गरजेचे आहे, असे नमूद केल.

निलेश पाटील यांनी अपघात, प्रशिक्षण यावर अधिक भर देण्याचे सांगत सुरक्षा व पर्यावरणबाबत अधिक जागृती करण्याचा मनोदय व्यक्त केला. सूत्रसंचालन सुयोग येरेकर यांनी केले.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी आरआयएचे व्यवस्थापक दयानंद नांदगावकर, प्रसाद देशमुख व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

भाजपकडून महामानवाला अभिवादन

अलिबाग : प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शनिवारी (दि. ६) भारतीय जनता पक्षातर्फे अलिबाग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. मनस्वी मोहिते, अलिबाग दक्षिण विभाग तालुकाध्यक्ष अशोक वारगे, उत्तर विभाग अध्यक्ष चेतन पाटील, मध्य विभाग अध्यक्ष रोशन भगत, महिला मोर्चा अलिबाग मध्य विभाग अध्यक्ष वृंदा राजगे, नगर परिषद निवडणूक नगराध्यक्षपदाच्या उमेदवार तनूजा पेरेकर तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार सुजाता इंगळे, विजया पार्सेकर, अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, कृष्णा चाळके, युवा प्रमुख ॲड. निखिल चव्हाण, अमित म्हात्रे, सुनील दामले, ॲड.मनोज ओव्हाळ, पंकज घरत, मोहनिश मुळे, जगदीश पाटील, संतोष पेरेकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी महामानवाला अभिवादन केले.

प्रेरणा कदम बनली एअर होस्टेस

नागोठणे : बातमीदार

मुरूड तालुक्यातील कोलई येथील सलून व्यावसायिक निवास कदम व नीलिमा कदम यांची कन्या प्रेरणा कदम हिची प्रतिष्ठित एअर इंडिया एअर लाईनमध्ये मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर होस्टेस म्हणून नियुक्ती झाली आहे.

ग्रामीण भागातील व सामान्य कुटुंबातील प्रेरणा हिची एअर होस्टेस म्हणून निवड झाल्यामुळे नातेवाईक व समाज बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे. सर्वस्तरांतून प्रेरणाचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

इंग्रजी शिक्षणासाठी नवघर शाळेत बँक ऑफ वर्ड उपक्रम

पाली : प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद शाळा नवघर येथे इंग्रजी शिक्षणासाठी एक आगळावेगळा आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. शाळेतील उपशिक्षिका शीतल पाटील गेल्या सहा ते सात महिन्यांपासून 'बँक ऑफ वर्ड' नावाचा उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी शब्दसंपत्ती वाढत असून स्पेलिंग पाठांतर, व्याख्या रचना व संवाद कौशल्य यामध्ये लक्षणीय सुधारणा होत आहे.

आजच्या ग्लोबल काळात मराठी शाळांपुढे उभ्या असलेल्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हणजे इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व. अनेक पालक, विद्यार्थी आणि समाजातील घटक यांना वाटते की इंग्रजी माध्यम म्हणजेच उज्वल भवितव्याची गुरुकिल्ली, तर मराठी माध्यम म्हणजे मागे राहण्याची शक्यता. या चुकीच्या समजुतीमुळे अनेक मराठी शाळांमध्ये असुरक्षिततेचे आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःहून एक कार्यसंघ तयार केला असून, बँकेच्या कार्यपद्धती प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याचे 'शब्द खाते' तयार करण्यात आले आहे. दररोज विद्यार्थ्यांकडून इंग्रजी शब्दांचे पाठांतर करून घेण्यात येते आणि त्याची नोंद त्यांच्या खात्यावर केली जाते. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक स्पर्धा आणि नव्या शब्दांच्या अभ्यासाची उत्सुकता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर बँक ऑफ वर्ड या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेत आमुलाग्र विकास होत आहे. या उपक्रमाच्या यशस्वीतेमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर, पदवीधर शिक्षिका वृषाली गुरव आणि अनुजा माने तसेच सहाय्यक शिक्षिका रुपाली लेंडवे व अंकिता जाधव यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

अशी आहे संकल्पना

केंद्रप्रमुख अनिल राणे व शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक प्रमोद म्हात्रे यांच्या संकल्पनेतून मी हा उपक्रम तयार केला. शाळेमध्ये स्वामी विवेकानंद पैशांची बँक आहे, ज्यामध्ये विद्यार्थी खाऊचे पैसे वाचवून बचत करतात आणि विविध आर्थिक व्यवहार करतात. त्याचप्रमाणे बँक ऑफ वर्ल्ड हा उपक्रम तयार करून इंग्रजी शब्दांची बँक तयार केली आहे. यामध्ये विद्यार्थी रोज इंग्रजीचे विविध शब्द घेतात व त्यांचे पाठांतर करतात. पहिली ते चौथीचे विद्यार्थी खूप चांगल्या प्रकारे शब्द म्हणतात आणि इयत्ता पाचवी ते आठवीचे विद्यार्थी इंग्रजी शब्दांबरोबरच इंग्रजी वाक्यदेखील तयार करतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती जाऊन त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे, असे उपक्रमशील शिक्षिका शितल पाटील यांनी सांगितले.

रजिप नवघर शाळेत इंग्रजी विषयासंदर्भात विद्यार्थ्यांना अधिक आत्मविश्वास वाढावा आणि आधुनिक जगात ती टिकून राहावी यासाठी शिक्षिका शितल पाटील यांना कल्पना सुचवली. त्यांनी तत्काळ बँक ऑफ वर्ड हा उपक्रम विकसित केला. त्यामुळे शाळेत आता इंग्रजी विषय विद्यार्थ्यांना आनंदाचा वाटू लागला आहे. व त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

-अनिल राणे,
केंद्र प्रमुख, केंद्र, पेडली

रिलायन्स बायो एनर्जीचे सेंद्रीय खत शेतकऱ्यांना मिळणार विनामूल्य

मार्गदर्शन शिबिर; संधीचा फायदा घेण्याचे आवाहन

धाटाव : प्रतिनिधी

रिलायन्स बायो एनर्जी नागोठणे यांनी विकसीत केलेले पाण्याच्या स्वरूपातील द्रव्यरूप सेंद्रिय खत शेतीसाठी परिणामकारक आहे. भातशेती, भाजीपाला कलिंगड यासह नारळी, सुपारी, आंबा, काजू सर्वच पिकांना ते उपयुक्त ठरत असून द्रव्यरूप सेंद्रिय खत विनामूल्य पोहचविण्यात येईल. शेतकऱ्यांनी संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन रिलायन्स बायो एनर्जीचे प्रमुख अंशुल दुबे यांनी उपस्थित कृतीशील, प्रयोगशील शेतकऱ्यांना केले आहे.

तळाघर येथील बयोज् फार्म येथे शुक्रवारी रिलायन्स बायो एनर्जी, स्वाध्याय फार्मर प्रोड्युसर कंपनी बळीराजा फाऊंडेशन आयोजित द्रव्यरूप सेंद्रिय आंबवलेले खत शेतकरी मार्गदर्शन शिबिरात अंशुल दुबे बोलत होते. त्यांनी रिलायन्स बायो एनर्जीचा सेंद्रिय खत हे शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारे आहे, असे सांगितले.

व्यासपीठावर रिलायन्स बायो एनर्जीचे आशिष राख, दीपांशू मुंडे, स्वाध्याय फार्मरचे जितेंद्र जोशी, बिजामृत फार्मरचे भारत पाटील, राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी संतोष दिवकर, उपकृषी अधिकारी कविता दोरगुडे, बळीराजा फाऊंडेशनचे राजेंद्र जाधव, प्रगतशील शेतकरी भाऊ दिके, खेळू थिटे, उपाध्यक्ष तुकाराम भगत, संज्योत पडवळ, अदिती थिटे, कृषी सेवक रेश्मा जोगदंडे, भारत खाडे, रोशन म्हात्रे, श्रद्धा पवार, युवा कृषी उद्योगाचे शेतकरी, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी स्वाध्याय फार्मरचे जितेंद्र जोशी यांनी रिलायन्स बायो एनर्जीचे द्रव्यरूप सेंद्रिय खत नेमके काय आहे याबाबत माहिती दिली. बायो एनर्जीचे आशिष राख यांनी द्रव्यरूप सेंद्रिय खत निर्मिती प्रक्रियेबाबत अवगत केले. आज सेंद्रिय शेतीकडे वळण्याची गरज आहे. शेती विषमुक्त करू व शेत जमिनीला निरोगी बनवू असे सांगत बळीराजा फाऊंडेशनचे राजेंद्र जाधव यांनी शेतकऱ्यांना मोफत, पोहच सेंद्रिय खत रिलायन्स बायो एनर्जी देणार असल्याबद्दल आभार व्यक्त केले.

दरम्यान, ज्या शेतकऱ्यांना द्रव्यरूप सेंद्रिय खत हवे असेल त्यांनी दीपांशू मुंडे (९२२६५३११८४) किंवा जितेंद्र जोशी (९२४९६५१९७३) यांच्याशी संपर्क साधावा.

सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्व संबंधितांना कळविण्यात येते की **रूम क्र. ११, प्रतिक सी.एच.एस., प्लॉट क्र. B/४८, सेक्टर- १२, खारघर - ४१०२१०** या मालमत्तेसंबंधीचे मूळ **अलॉटमेंट लेटर, जे योगिता भगवान पाटील आणि ऋषिकेश भगवान पाटील** यांच्या नावावर जारी करण्यात आले होते, ते हरवले असून सर्वत्र शोध घेतल्यानंतरही सापडले नाही.

उक्त अलॉटमेंट लेटर कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे तारण, गहाण किंवा जमा केलेले नाही. वरील अलॉटमेंट लेटर किंवा त्यासंबंधीच्या मालमत्तेबाबत कोणालाही कोणताही हक्क, मालकी हक्क, स्वारस्य, दावा किंवा हरकतीचा अधिकार नाही.

वरील हरवलेले दस्तऐवज आढळून आले अथवा त्यासंबंधी कोणाला कोणताही दावा वा हरकत असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ (पंधरा) दिवसांच्या आत** खाली नमूद केलेल्या पत्त्यावर माझ्याशी संपर्क साधावा. दिलेल्या कालावधीत कोणतीही हरकत/दावा प्राप्त न झाल्यास, कोणताही दावा अस्तित्वात नाही असे समजण्यात येईल आणि माझ्या ग्राहकास **डुप्लिकेट अलॉटमेंट लेटर** मिळविण्यास किंवा आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी स्वातंत्र्य असेल.

माझ्या वतीने व माझ्या ग्राहकांच्या वतीने :

दि.०७/१२/२०२५.

सही/-
वकील आदित्य कटकदौड
खारघरचा राजा गणेश मंदिर (तळमजला)
सेक्टर १२ खारघर नवी मुंबई ४०००२१०

सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्व संबंधितांना कळविण्यात येते की **रूम क्र. १२, प्रतिक सी.एच.एस., प्लॉट क्र. B/४८, सेक्टर - १२, खारघर - ४१०२१०** या मालमत्तेसंबंधीचे मूळ **अलॉटमेंट लेटर, जे उमाकांत भगवान पाटील** यांच्या नावावर जारी करण्यात आले होते, ते हरवले असून सर्वत्र शोध घेतल्यानंतरही सापडले नाही.

उक्त अलॉटमेंट लेटर कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे तारण, गहाण किंवा जमा केलेले नाही. वरील अलॉटमेंट लेटर अथवा संबंधित मालमत्तेबाबत कोणालाही कोणताही हक्क, मालकीहक्क, स्वारस्य, दावा किंवा हरकतीचा अधिकार नाही.

वरील हरवलेले दस्तऐवज आढळून आले अथवा त्यासंबंधी कोणाला कोणताही दावा वा हरकत असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ (पंधरा) दिवसांच्या आत** खाली नमूद केलेल्या पत्त्यावर माझ्याशी संपर्क साधावा. निर्धारित कालावधीत कोणतीही हरकत किंवा दावा प्राप्त न झाल्यास, कोणताही दावा अस्तित्वात नाही असे समजण्यात येईल आणि माझ्या ग्राहकास **डुप्लिकेट अलॉटमेंट लेटर** प्राप्त करण्यासाठी किंवा आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी स्वातंत्र्य असेल.

माझ्या वतीने व माझ्या ग्राहकाच्या वतीने :

दि.०७/१२/२०२५.

सही/-
वकील आदित्य कटकदौड
खारघरचा राजा गणेश मंदिर (तळमजला)
सेक्टर १२ खारघर नवी मुंबई ४०००२१०

मोरे कॉलेजच्या विद्यार्थिनींची क्षेत्रभेट

रोहा : प्रतिनिधी

एम.बी मोरे फाउंडेशन संचलित सौ. वरदा सुनील तटकरे महिला महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थिनींची क्षेत्रभेट शुक्रवारी प्रवरा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, रोहा येथे आयोजित करण्यात आली होती.

पतसंस्थेचे सीईओ एम.डी. कानावडे, मॅनेजर अपूर्वा कुलकर्णी, अकाउंटंट अवनी ओक, महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे प्रा. नरेश घाग, प्रा. अतुल आणि २८ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या सर्टिफिकेट कोर्स समितीच्या प्रमुख प्रा.अक्षता ठाकूर यांनी क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते.

नागोठणे येथे साईबाबा उत्सव, पालखी सोहळा

नागोठणे : बातमीदार

नागोठणे रामनगर येथे श्री साई मित्र मंडळातर्फे श्री दत्त जयंती आणि साईबाबांच्या प्रतिष्ठापनेच्या २४व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून मंदिरात उत्सव व साई पालखी सोहळा दोन दिवस भक्तिमय वातावरणात झाला.

यानिमित्ताने हरिपाठ, साईबाबा दुग्धभिषेक, ध्वज पूजन, श्री सत्यनारायणाची महापूजा, मूर्तीवर पुष्पवृष्टी, महाआरती, साई भंडारा (महाप्रसाद) आणि पालखी मिरवणूक काढण्यात आली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री साई मित्र मंडळ उत्सव कमिटी रामनगरचे अध्यक्ष शेखर गोळे, उपाध्यक्ष शुभम गुप्ता, खजिनदार सुरज तुरे, सचिव जितेंद्र कजबजे, निखिल पानकर, सदस्य सुरज वर्मा, चेतन भिंगारे, अक्षय भिंगारे, अनिकेत बेलोसे, गजानन खंडारे आदींनी मेहनत घेतली.

दक्षिण आफ्रिकेच्या २७० धावा

कुलदीप, कृष्णाच्या प्रत्येकी चार विकेट्स

विशाखापट्टणम : वृत्तसंस्था

कुलदीप यादवच्या फिरकीतील जादू आणि प्रसिद्ध कृष्णाच्या भेदक माऱ्याच्या जोरावर भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाला २७० धावांत ऑलआउट केले. विशाखापट्टणमच्या मैदानात पहिल्या षटकात पहिली विकेट गमावल्यावर क्विंटन डी कॉक आणि टेम्बा बावुमाने शतकी भागीदारी केली. सलामीवीर डी कॉकचे शतक, तर टेम्बा बावुमाच्या उपयुक्त ४८ धावांच्या खेळीशिवाय अन्य कुणालाही भारतीय गोलंदाजांनी फार काळ टिकू दिले नाही. भारताकडून कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा दोघांनी प्रत्येकी चार विकेट्स घेतल्या.

दोन वर्षे आणि २० वनडे सामन्यानंतर नाणेफेक जिंकून लोकेश राहुलने मालिकेतील निर्णायक सामन्यात पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्याच षटकात अर्शदीप सिंगने कर्णधाराचा निर्णय सार्थ ठरवत रायन रिकल्टनला खातेही न उघडता माघारी धाडले, पण त्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने संयम दाखवत मॅचमध्ये कमबॅक केले.

पहिल्याच षटकात पहिली विकेट गमावल्यावर क्विंटन डी कॉक आणि कर्णधार टेम्बा बावुमा या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. ही जोडी डोकेदुखी ठरतीये असे वाटत असताना रवींद्र जडेजाने बावुमाला ४८ धावांवर तंबूत धाडले. दुसऱ्या बाजूला डी कॉकने शतक साजरे केले, पण त्यानंतर प्रसिद्ध कृष्णाने त्याला लगेच तंबूत धाडले.

मग कुलदीप यादवने डेवॉल्ड ब्रेविस २९ (२९), मार्को यान्सेन १७ (१५) आणि कॉर्बिन बॉश ९ (१२) या घातक फलंदाजांसह लुंगी एनगिडीच्या रूपात चार विकेट्सचा डाव साधला. पहिल्या दोन वनडेत स्फोटक बॅटिंगचा नजराणा पेश करणाऱ्यांना भारतीय गोलंदाजांनी स्वस्तात माघारी धाडल्यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ५० षटकेही खेळता आली नाहीत. दक्षिण आफ्रिका संघ ४७.५ षटकात २७० धावांत आटोपल्यामुळे भारतीय संघाला सामन्यासह मालिका जिंकण्यासाठी २७१ धावांचे टार्गेट मिळाले.

बॉक्सिंग स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची चमक

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय खांदा कॉलनी येथे आयोजित बॉक्सिंग स्पर्धेत नवीन पनवेलमधील सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमक दाखवली.

पल्लवी कणसे व अजय सत्रे या दोन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर अनिकेत दुशिंग, तेजल भोईटे, रितूल म्हात्रे, पार्थ पाटील या चार विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

या चमकदार कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

वाशीत व्हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा

नवी मुंबई : बातमीदार

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनच्या मान्यतेने ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिशन व नवी मुंबई मॅच्युअर व्हॉलीबॉल असोसिएशन तसेच कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी यांच्या सहकार्याने नवी मुंबई महानगरपालिका चषक महाराष्ट्र राज्य ज्युनिअर व्हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा २०२५-२६चे आयोजन ५ ते ७ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू त्या त्या जिल्ह्यांतील उत्कृष्ट आहेत. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून निवड चाचणीअंती विभागीय स्तरावर संघ निवडण्यात आले आहेत. अशा राज्यातील आठ विभागांतून आठ मुलांचे व आठ मुलींचे नामांकित संघ आपल्या स्पर्धेत आपल्या क्रीडागुणांचे दर्शन घडवत आहेत.

स्पर्धा कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी येथे होत असून विजेत्या संघांना रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह तसेच वैयक्तिक सर्वोत्कृष्ट खेळाडूंनाही पारितोषिके व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

फुंडे विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

उरण : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. उद्घाटन समारंभास माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भार्गव पाटील, उपाध्यक्ष दीपक ठाकूर, सदस्य गोपाळ पाटील, राजेंद्र ठाकूर, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एम. बाबर, एस.एस. पाटील, लेखनिक नवनीत ठाकूर, ज्युनिअर कॉलेज सर्व सेवक, माध्यमिक सेवक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य बी.बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या क्रीडा महोत्सवात ज्युनिअर कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. केशव पवार यांनी क्रीडा स्पर्धेची सामूहिक शपथ दिली. क्रीडा महोत्सवात सांघिक विविध खेळ खो-खो, कबड्डी, लंगडी वैयक्तिक खेळ, फनी गेम्स यांचा समावेश होता. प्रथम, द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धेकांना वार्षिक स्नेहसंमेलनात पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल.

क्रीडा महोत्सवाचे संपूर्ण नियोजन विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डी. डी. पाटील यांनी केले. समालोचन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन. पाटील यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण सर्व सेवकांनी केले. समारोप प्राचार्य साळुंखे यांच्या भाषणाने झाला.

उसर खुर्दच्या अभिनव ज्ञानमंदिरमध्ये क्रीडा महोत्सव

माणगाव : प्रतिनिधी

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित अभिनव ज्ञानमंदिर, उसर खुर्द विद्यालयात दोन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सव रंगला. याचे औपचारिक उद्घाटन राष्ट्रीय आईस हॉकी खेळाडू तनय उतेकर व विद्यालयाचे माजी विद्यार्थी केतन वाजे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलन करून करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे उतेकर आणि वाजे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक श्री. सुर्वे यांनी प्रतिकूल परिस्थितीला हरवून नाव कमावणाऱ्या खेळाडूंच्या प्रेरणादायी कथा सांगून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

प्रमुख अतिथी लक्ष्मण रामजी तांबे व दिलीप पांचाळ यांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व मेडल देऊन गौरविण्यात आले. उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक क्रीडा विभागप्रमुख विनोद लाड यांनी केले.

विंडीजच्या जस्टिन ग्रीव्हसचा वर्ल्ड रेकॉर्ड

क्राइस्टचर्च : न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यातील क्राइस्टचर्च येथे खेळलेला पहिला कसोटी सामना अनिर्णित राहिला. विंडीजच्या फलंदाजांनी कडवी झुंज देत न्यूझीलंडच्या संघाला मोठी धावसंख्या उभारूनही विजय मिळवू दिला नाही. यादरम्यान द्विशतकी खेळी करणाऱ्या जस्टिन ग्रीव्हसने विश्वविक्रम केला आहे.

न्यूझीलंडने वेस्ट इंडिजसमोर ५३१ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरादाखल वेस्ट इंडिज संघाने शानदार कामगिरी करत ४५७ धावा केल्या आणि सामना अनिर्णित ठेवला. या सामन्यात वेस्ट इंडिजने ७२ धावांवर चार विकेट गमावल्या होत्या आणि संघ कठिण परिस्थितीत होता. यानंतर शे होपने शतकी खेळी केली. होपने २३४ चेंडूंत १५ चौकार व दोन षटकारांसह १४० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यानंतर सहाव्या क्रमांकावर आलेल्या जस्टिन ग्रीव्हसने नाबाद द्विशतक करत संघाचा पराभव टाळला.

ग्रीव्हसने ३८८ चेंडूत १९ चौकारांसह नाबाद २०२ धावांची खेळी केली. या कामगिरीसह ग्रीव्हस चौथ्या डावात सहाव्या किंवा त्याहून खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना द्विशतक करणारा जगातील पहिला फलंदाज बनला आहे. याआधी बेन स्टोक्सने ऑस्ट्रेलियाविरुद्ध लॉर्ड्सच्या मैदानावर १५५ धावांची खेळी केली होती.

सौजन्य : चिन्मय समेळ

सौजन्य : गौरव कांडपिळे
(उपाध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा भाजपा)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com